**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०३**

नगरसचिव कार्यालय

दिनांक : ३० / ०६ /२०१७

प्रति,

मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र - ३ सोमवार दि. ०३ /०७ /२०१७ रोजी सकाळी १०.१५ वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-

प्र. नगरसचिव,

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका

**सोमवार दिनांक - ०३ /०७/२०१७ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १८ | अर्जदार श्री.सुनिल मोतीलाल ताथेड रा.माणिकनगर अ.नगर वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.१०७६ व बिल क्र.६५८ या दोन्ही मालमत्ता एकच असल्याने दोन वेगवेगळी बिले येत असल्याने बिल क्र.६५८वरील ओपन प्लॉट ची घरपट्टी आकारणी रू.५४०२५/- अधिक शास्ती सन २०१६-१७ अखेर थकबाकी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | अर्जदार श्री. चंद्रकांत महादु बेद्रे , रा. एकता कॉलनी,अ.नगर प्रभाग समिती क्र. ४, वॉर्ड क्र.२५ बिल नं. ४७६ नुसार नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकरण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम निर्लेखीत करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २० | मा.केंदशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम ई - निविदा क्र.१५२० चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व ठेकेदाराचे वाटाघाटी नंतरचे अंतीम देकाराबाबत म.जी.प्रा.चे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट |

PTO

| | |
|---|---|
| २३ | अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट |
| २४ | अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| २५ | अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २६ | अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २७ | अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २८ | अहमदनगर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. आर.बी.गायकवाड, वरिष्ठ लिपिक , सा.प्र.वि. यांचे प्रवास भत्ता खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट . |

सही /-

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- १८ ते २८ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १८ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.सुनिल मोतीलाल ताथेड रा.माणिकनगर अ.नगर वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.१०७६ व बिल क्र.६५८ या दोन्ही मालमत्ता एकच असल्याने दोन वेगवेगळी बिले येत असल्याने बिल क्र.६५८वरील ओपन प्लॉट ची घरपट्टी आकारणी रू.५४०२५/- अधिक शास्ती सन २०१६-१७ अखेर थकबाकी निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव रोड.

वॉर्ड क्र.२१ मधील वुली लिपीक यांच्याकडून रिपोर्ट देण्यात येतो की,श्री.सुनिल मोतीलाला ताथेड रा.माणिकनगर अ.नगर वॉर्ड नं.२१ बिल नं.१०७५ व बिल क्र.६५८ यांनी दि.२२/४/२०१६ रोजी अर्ज देवून मला एकाच मालमत्तेचे दोन बिल येत आहे.तरी ओपन प्लॉटचे बिल क्र.६५८ मी करून आकारणी बिल क्र.१०७६ बिल दुरूस्त करून देण्यात यावे असे इकडेस अर्ज देवून कळविले आहे.

वरील प्रमाणे मालमत्ता धारक श्री.सुनिल मोतीलाल ताथेड रा.माणिकनगर अ.नगर वॉर्ड नं.२१ बिल नं.१०७६ व बिल क्र.६५८ या मालमत्तेची दि.१/१०/२०१६ रोजी कर निरिक्षक समवेत पहाणी केली असता सदर जागेवर बांधकाम करून त्यास आकारणी झालेले निदर्शनास आले व पुर्वीचे तत्कालीन लिपीक यांनी ओपन प्लॉटचे बिल कमी न करता सदर ओपन प्लॉटची पण आकारणी बिल क्र.६५८ वर ठेवण्यात अली असल्याने सदर मालमत्ता धारक यांना आकारणी केलेली व ओपन प्लॉट असे एकुत्र जागेचे दोन बिल जातात असे अढळून आले.तरी आकारणीचे बिल सदर मालमत्ता धारक यांनी सन २०१५-२०१६ पर्यत पुर्ण भरले असून ओपन प्लॉटचे बिल क्र.६५८ वरील सन २०१६-१७ पर्यत थकबाकी रू.५४०२५+शास्ती निर्लेखीत करणेस्तव महाराष्ट्र मुंबई प्रांतीक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ प्रमाणे निर्लेखित करणे आवश्यक आहे.सदरचा प्रस्ताव मंजूरी करीता आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक यांचा अहवाल असे. यावर कर निरीक्षक यांची स्वाक्षरी.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,रिव्हीजन विभाग कार्यवाहीस.

यावर सहाय्यक मुल्य निर्धाकर,कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की,कर निरीक्षक यांचे अहवालानुसार सदर मालमत्ता धारकास खुला भुखंड व रहीवासानुसार अशी दोन बिले जात आहेत.कर निरीक्षक यांचे दि.१३/१०/१६ चे समक्ष पहाणी अहवालानुसार सदर मालमत्तेवर खुला भुखंडाचे बिल शास्तीसह महाराष्ट्र मनपा अधि.मधील कलम १५२ नुसार निर्लेखित करणेकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे उचित होईल.तथापी शास्ती बाबत नियम ५१ नुसार मा.आयुक्त साहेब अधिकार असलयाने.सदर थकबाकी निर्लेखित झाल्यांस शास्ती माफी देणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, बील नं.२१/६५८ श्री.ताथेड यांचे संपुर्ण नांव काय याचा खुलासा करून सादर करा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांची स्वाक्षरी.

यावर वसुली लिपीक व करनिरीक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तत प्रकरणी मा.मुलेप यांनी दि.२३/११/२०१७ रोजी आदेशीत केल्याप्रमाणे उक्त मालमत्ता धारक यांचा मिळकतीचा ७/१२ उतारा सोबत जोडून देण्यात येत आहे.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की,फेरसादर प्रस्तावानुसार महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२चे प्रकरण ८ कराधान नियम २१,१ (फ) अन्वये कार्यवाही करणे हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,बांधकाम परवानगी आणि कंम्प्लीशन सर्टफिकेट सोबत सादर करावे ओपन स्पेस चे भाडे केव्हा पासुन आकारणी किती आहे.यासह सविस्तर टिपण्णी सह फेरसादर करावे पेज नंबर पुर्ण करावे.यावर प्रभाग अधिकारी,कर निरीक्षक,वसुली लिपीक,यांचा अभिप्राय की,फेरसादर प्रस्तुत प्रकरणी मा.मुलेप यांनी दि.२६/४/१७ रोजी आदेशीत केलेनुसार बांधकाम परवानगी व मंजुर बांधकाम नकाशा सोबत जोडून देण्यात येत आहे.तसेच सदरचे प्रकरणामध्ये दुबार नोंदीमुळे बी.क्र.३५८ निर्लेखित करणे बाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की,मुळ प्रस्तावातील आदेशान्वये मुद्देनिहाय सादर करा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मुख्यलेखाअधिकारी यांचे दि.२७/४/१७ प्रमाणे पुर्तता केली नाही.पुर्ततासह ठेवा.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,यथा प्रस्तावितनुसार "क्ष" प्रमाणे मान्यतेस हरकत नाही. निर्लेखित प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी आदेशार्थ सादर

यावर मा.अति.आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय क्रमांक १८ व १९ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.बाळासाहेब बोराटे :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- विषय क्रमांक १८ व १९ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्र.१८ व १९ हे विषय घरपटटी , पाणीपटटी निर्लेख्ीत करण्याचे आहेत.त्यांची घरपट्टी अथवा पाणिपट्टी जे रिपोर्ट मध्ये नमूद असेल ते निर्लेखीत करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक १८ व १९ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अर्जदार श्री.सुनिल मोतीलाल ताथेड रा.माणिकनगर अ.नगर वसुली वॉर्ड क्र.२१ बिल नं.१०७६ व बिल क्र.६५८ या दोन्ही मालमत्ता एकच असल्याने दोन वेगवेगळी बिले येत असल्याने बिल क्र.६५८वरील ओपन प्लॉट ची घरपट्टी आकारणी रू.५४०२५/- थकबाकी निर्लेखित करणे बाबत करण्यास ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- १९ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. चंद्रकांत महादु बेद्रे , रा. एकता कॉलनी,अ.नगर प्रभाग समिती क्र. ४, वॉर्ड क्र.२५ बिल नं. ४७६ नुसार नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकरण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम निर्लेखीत करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगांव रोड.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो की,चंद्रकांत महादु बेद्रे ख.शामलाल जगन्नाथ तेरवाडीया रा.एकता कॉलनी अहमदनगर वॉर्ड नं.२५ बिल नं.४७६ यांनी दि.१९/८/१६ रोजी इकडेस अर्ज देवून कळविले आहे की,एकता कॉलनी मध्ये माझे घर असून माझ्या मिळकतीवर अद्यापपर्यंत नळ कनेक्शन घेतलेले नाही.परंतु मला रू.१५००/- पाणीपट्टी आकारण्यात येत आहे.तरी कृपया नळकनेक्शन नासतांना येणारे पाणीपट्टी बिल रद्द करावे.असे त्यांनी इकडेस अर्ज देवून कळविले आहे.

आलेला अर्ज मनपा फिटर यांचेकडेस स्थळ पहाणी करणेकरीता दि.२०/८/२०१६ रोजी पाठविला असता मनपा फिटर यांनी दि.८/९/२०१६ रोजी समक्ष पहाणी करून सदर मिळकतीवर नळ कनेक्शन नसले बाबत अहवाल सादर केला आहे.

अर्जदारास सन १९९५-९६ ते १९९६-९७ रू.२४०/- २००२ ते २००३ रू.८०६/-,२००३ ते २००४ ते २०१६-१७ रू.१५००/- या प्रमाणे १/२" नळ कनेक्शन प्रमाणे पाणीपट्टी आकारली जात आहे.सन १९९६-९६ ते सन २०१६-१७ अखेर अर्जदाराकडे रू.२६३१६/- पाणीपट्टी तसेच त्यावर आकारण्यात आलेली शास्ती रक्कमवसुल न होणारी,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ प्रमाणे निर्लेखित करणे आवश्यक आहे.सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजुरीस ठेवणे आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की,रिव्हीजन विभाग,वसुली लिपीक व करनिरीक्षक यांचे प्रस्तावित नुसार पुढील कार्यवाहीस्तव.

यावर सहाय्यक कर मुल्यनिर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, वसुली लिपीक,फिटर,शहर अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांचा समक्ष स्थळ पहाणी अहवाल व करनिरीक्षक,प्रभाग अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार व अधिनियमातील तरतुदी नुसार कार्यवाही करणे उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, सहाय्यक कर मुल्यनिर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार महाराष्ट्र मनपा अधिनियम २०१२ चे प्रकरण ८ कराधान नियम २०१ (फ) अन्वये कार्यवाही करणेस हरकत नाही.

सन १९९५ -९६ पासुन झालेल्या विलंबाबाबत सदर अभिप्राय देवून त्याबाबत कार्यवाही प्रस्तावित करणे योग्य ठरेल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावितनुसार व नमुद "क्ष" प्रमाणे मा.स्थायी समिती सभेत निलेखित करणेस हरकत नाही.मे .आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय क्रमांक १८ व १९ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.बाळासाहेब बोराटे :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- विषय क्रमांक १८ व १९ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्र.१८ व १९ हे विषय घरपटटी , पाणीपटटी निर्लेख्ीत करण्याचे आहेत.त्यांची घरपट्टी अथवा पाणिपट्टी जे रिपोर्ट मध्ये नमूद असेल ते निर्लेखीत करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.श्री.मुदस्सर शेख :- विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक १८ व १९ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसारअर्जदार श्री. चंद्रकांत महादु बेद्रे , रा. एकता कॉलनी,अ.नगर प्रभाग समिती क्र. ४, वॉर्ड क्र.२५ बिल नं. ४७६ नुसार नळ कनेक्शन नसतांना पाणीपटटी आकरण्यात आलेली पाणीपट्टी रक्कम निर्लेखीत करणेस ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २० सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.केंद्रशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम ई - निविदा क्र.१५२० चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व ठेकेदाराचे वाटाघाटी नंतरचे अंतीम देकाराबाबत म.जी.प्रा.चे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग.

**संदर्भ :- १)** दि. १७/०६/२०१७ रोजीची मा. छाननी समितीची बैठक **२)** दि. १९/०६/२०१७ रोजीची मा. छाननी समितीची बैठक **३)** मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि.पुणे यांचे दि.१९/०६/२०१७ चे पत्र **४)** पा.पु. जा.क्र.३३० दि. १९/०६/२०१७ चे पत्र **५)** मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नाशिक यांचे जा.क्र. मुअ/ नाशिक / लेखा/ निविदा/१११५ दि. २१/०६/२०१७ चे पत्र **६)** दि.२३/०६/२०१७रोजीची मा. छाननी समितीची बैठक**७)** मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांचे दि. २३/०६/२०१७ चे पत्र **८)** म.न.पा.चे जा.क्र. पा.पु. ३५५ दि. २३/०६/२०१७ चे पत्र **९)** मा. नगरसेवक श्री. संपत विजय बारस्कर व इतर १९ मा. नगरसेवक यांचे दि. २३/०६/२०१७ चे पत्र **१०)** मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई यांचे जा.क्र. ५५० दि. २७/०६/२०१७ चे पत्र **११)** मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नाशिक यांचे जा.क्र. मुअ/ नाशिक / लेखा/ निविदा/११४१. २८/०६/२०१७ चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, "अमृत " अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामांची ई निविदा क्र. १५२० अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रसिध्द करण्यात आलेली होती.

सदर निविदेसाठी मा. अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा. यांचे सुचनेनुसार मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. म.जी.प्रा. चे सुचनेनुसार त्यांचेशी वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटी अंती प्राप्त देकार व त्यांची वित्तीय लिफाफयामधील कागदपत्रे तपासणीसाठी म.जी.प्रा. कडे पाठविण्यात आली.

त्या अनुषंगाने मा. मुख्य अभियंता, म.जी.प्रा नाशिक यांचे संदर्भिय पत्र क्र. ५ म.न.पा.स प्राप्त झाले. असून मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांचे देकारा बाबत मुल्यांकन करून त्याबाबतचा अहवाल इकडेस सादर केला होता. प्राप्त अहवालामध्ये मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यची निविदा स्विकारावी किंवा कसे ? याबाबत स्पष्टपणे अभिप्राय नसल्या कारणामुळे मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांना पुन्हा वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. दि. २३/०६/२०१७ रोजी वाटाघाटी झालेनुसार त्यांनी ७.५० % जादा असा सुधारीत देकार सादर केला व तो पुन्हा म.जी.प्रा. कडे पाठविण्यात आला होता.

विषयांकित योजनेच्या मुल्यांकना बाबत मा. प्रधान सचिव, (नवि - २ ) नगर विकास विभाग यांना अग्रेषित मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्र.१० ची प्रत म.न.पा.स प्राप्त झाले. मे.शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांनी त्यांचे दि. २७/०६/२०१७ चे पत्रानुसार ०.५% ने कमी करून अंतीम सुधारीत देकार ७.०० % जादा दिलेला आहे. ठेकेदाराने दिलेला देकार अंदाजीत किंमतीपेक्षा जास्त असल्याने या संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले आहे.

मा. मुख्य अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र. ११ म.न.पा.स प्राप्त झाले असून खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

| अ.न. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | निविदेतील कामाची अंदाजित किंमत<br>(सन २०१५-२०१६ च्या दरसुची नुसार) | रू. १,००,४४,५३,२९८/- |
| २ | चालू दरसुची २०१६-२०१७ नुसार निविदेतील कामाची एकूण अंदाजित किंमत (परिशिष्ट ३ ) | रू. १,००,३९,३५,४३४/- |
| ३ | संभाव्य दरसुचीतील वाढ (शासन निर्णयामध्ये उल्लेख असल्यास ) (परिशिष्ट - ४) | -- |
| ४ | शासन निर्णय क्र. बीसी.ए - २००९/ प्र.क्र.१०८/ कामगार - ७ अ, दि. १७/०६/२०१० अन्वये विचारात घ्यावयाच्या १% कामगार कल्याण उपकरासाठीची तरतूद (परिशिष्ट ५ नुसार) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीमधील दर वगळता | रू. ९७,७४,९५६/- |
| ५ | शासन परिपत्रक क्र.डी.एस. आर.१०९० / सी.आर.६४५३ / पीएलएन३, दि.१४/०७/१९९३ अन्वये विचारात घ्यावयाच्या १ % लेबर ॲमेनिटीजसाठीची तरतूद (परिशिष्ट ५ नुसार ) | रू. ३५,९८,३९९/- |
| ६ | चालू दरसुची सन २०१६-२०१७ नुसार निविदेतील कामाची एकूण मुल्यांकित किंमत (२+३+४+५) | रू. १,०१,७३,०८,७८९/- |
| ७ | ठेकेदाराच्या आयुक्त, म.न.पा. यांचे स्तरावर झालेल्या वाटाघाटीनुसार अंतीम देकाराची किंमत ७.०० % जादा दराने | रू.१,०७,४७,६५,०२९/- |
| ८ | एकूण मुल्यांकित किंमतीवर ठेकेदाराच्या सुधारीत देकाराची तुलना<br>(१,०७,४७,६५,०२९ (- ) १,०१,७३,०८,७८९) x १००<br>१,०१,७३,०८,७८९ | **५.६४७ %<br>जादा दराने** |

मा. शासनाने रू. १४०.७५ कोटी इतकी रक्कमेच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. परंतू मा. मुख्य अभियंता यांनी दिलेल्या अहवाला नुसार ठेकेदाराने दिलेला अंतीम देकार हा मुल्यांकित किंमतीवर ५.६४७ % जादा इतका येत असून मंजूर योजनेचे ( रू. १४०.७५ कोटी ) पूर्ण काम करणेस एकूण १४७.७६ कोटी इतका खर्च येणार आहे. त्यामुळे ठेकेदाराने ७.०० % जादाचा सुधारीत देकार दिला असल्यामुळे योजनेच्या मंजूर रक्कमे व्यतिरिक्त रू. ७.०१ कोटी इतका निधी अतिरिक्त लागणार असून तो म.न.पा.स उभारावा लागेल. म.जी.प्रा.चे अहवालानुसार यासाठी महानगरपालिकेचा ठराव आवश्यक आहे. म.जी.प्रा. ने सादर केलेला अहवाल स्वाक्षरीसह वरीलप्रमाणे नमूद केलेनुसारचा ठरावासह प्रस्ताव पुनश्च म.जी.प्रा. कडे सादर करणे करिता कळविले आहे. तसेच ठेकेदाराचा अंतीम देकार अंदाजित किंमतीपेक्षा जास्त असल्याने या संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले आहे.

विषयांकित निविदे बाबतच्या म.जी.प्रा. च्या अहवालामध्ये खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

**तांत्रिक व आर्थिक बाबीचा तसेच मुल्यांकनाचा विचार करता मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. पुणे यांनी सादर केलेल्या देकाराशी (निविदेच्या अंदाजित किंमतीपेक्षा ७.०० % जादा दराने) सन २०१६-२०१७ च्या मुल्यांकित किंमतीशी तुलना करता ५.६५ % जादा दराने येत आहे.**

**या कामासाठी अद्याप पर्यंत ३ वेळा निविदा बोलविण्यात आलेल्या आहेत. २ ज्या मागणी वेळी मे. ऑफशोअर इन्फ्रास्ट्रक्चर यांनी सादर केलेला देकार हा जास्त असल्याने त्यांची निविदा नाकारण्यात येवून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्राप्त झालेला मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. यांनी सादर केलेला देकार ७.०० % जादा दराने रास्त असून सदर दर स्विकारण्याची शिफारस करण्यात येत आहे.**

**योजनेची मंजूर किमत रू. १४०.७५ कोटी आहे. ठेकेदाराच्या देकारा नुसार व मंजूर योजनेत समाविष्ठ मंजूर निविदेत समाविष्ठ नसलेल्या बाबींचा एकूण खर्च लक्षात घेता योजनेवरील अपेक्षित खर्च हा रू. १४७.७६ कोटी एवढा येत आहे.**

**त्यामुळे कंत्राटदाराने ७.०० % निविदा जास्त दराने भरलेला असल्याने वाढीव देकारामुळे होणारा वाढीव खर्च रू. ७.०१ कोटी ही रक्कम अहमदनगर महानगरपालिकेला स्वतः च्या निधीमधून उभारावी लागेल.**

ई निविदा क्र. १५२० च्या अनुषगाने मा. नगरसेवक श्री. संपत विजय बारस्कर व इतर १९ मा. नगरसेवक यांचे मा. प्रधान सचिव (नवि - २ ) नगर विकास विभाग यांना अग्रेषित पत्राची प्रत म.न.पा.स प्राप्त झाली आहे. विषयांकित कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली असून ठेकेदाराने अवाजवी व जादा रक्कमेची निविदा भरली आहे. सदरची निविदा मंजूर करून निविदा प्रकरणात आर्थिक गैरव्यवहाराची परिस्थिती निर्माण झ ाली आहे. याकरिता सदर निविदा प्रकरणातील अनियमितता दुरूस्त करण्यात यावी. व कोणत्याही परिस्थितीत सदरचे काम अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा जादा दराने देण्यात येवू नये. अन्यथा एकूण कार्यपध्दती बद्दल जनआंदोलन उभारण्यात येईल. असे कळविले आहे.

१) ई निविदा क्र. १५२० बाबत मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्र.१० अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. / 'अ'
२) मा. मुख्य अभियंता यांचे संदर्भिय पत्र क्र.११ अन्वये प्राप्त अहवाला नुसार मे. शोनन इंजिनिअरींग प्रा.लि. पुणे यांनी सादर केलेला देकार ७.०० % जादा दराने हा रास्त असून सदर दर स्विकारणेची शिफारस केलेली आहे. परंतू त्यानुसार सदर निविदेस रू. ७.०१ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार आहे. सदरचा निधी म.न.पा.स अतिरिक्त उभारावा लागणार असून म.न.पा. च्या ठरावाची आवश्यकता आहे. यासाठी मा. स्थायी समिती किंवा मा. महासभेची मंजूरी घेणे गरजेचे आहे तसेच ठेकेदाराचा अंतीम देकार अंदाजित किंमतीपेक्षा जास्त असल्याने या संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले आहे. /'अ'
३) मा. नगरसेवक श्री. संपत विजय बारस्कर व इतर १९ मा. नगरसेवक यांचे संदर्भिय पत्र क्र. ९ मध्ये नमूद केलेनुसार सदरची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराने न देणे बाबत म.न.पा.स कळविले आहे. /'अ'

ई निविदा क्र. १५२० च्या अनुषंगाने वरीलप्रमाणे नमूद ३ मुद्यांच्या अनुषंगाने अंतीम निर्णय होणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर मा. विभाग प्रमुख (अमृत अभियान) यांचा अभिप्राय की,अहवाला नुसार मान्यतेस्त सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,उपरोक्त 'अ' बाबत मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यास हरकत नसावी.तथापी प्राप्त दरा बाबत मा.राज्यस्तरीय निविदा समितीला कमीत कमी दाराची निविदा मंजूरी देणे बाबत विनंती करण्यास हरकत नसावी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, अ + अ व pmcअहवालासह प्राप्त निविदांबाबत मे.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणे योग्य.

यावार मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.केंद्रशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम ई - निविदा क्र.१५२० चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व ठेकेदाराचे वाटाघाटी नंतरचे अंतीम देकाराबाबत म.जी.प्रा.चे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.दत्ता कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- योजने मध्ये कोण कोणती कामे होणार आहेत ?

कनिष्ठ अभियंता पा.पु.विभाग श्री. काकडे :- या योजने अंतर्गत, योजना तयार करणे व सर्व्हे करणे,अॅप्राच चॅनल,सदयस्थितीतील जॅकवेल ची दुरूस्ती करणे,रॉ वॉटर रयझिंग मेन व इतर अनुषंगीक कामे,सदयस्थितीतील बी.पी.टी. ची दुरूस्ती करणे,रॉ वॉटर ग्रॅव्हिटी मेन,जलशुध्दीकरण केंद्र क्षमता ४५ एम.एल.डी.ची स्थापत्य व यांत्रिकी दुरूस्त करणे,स्काडा व अॅटोमायझेशन,शुध्द पाणी रायझींग मेन,वसंत टेकडी येथे जी.एस.आर क्षमता ५ एम.एल.,वसंत टेकडी येथील सदयस्थितील जी.एस.आर ची दुरूस्त करणे क्षमता ६.८० एम.एल.,किरकोळ कामे,ग्रीड सोलन पॉवर प्लॅंट क्षमता ५ एम.डब्ल्यु. इत्यादी कामाचा समावेश आहे.

मा.सभापती साहेब :- या योजना केव्हा मंजूर करण्यात आली.

कनिष्ठ अभियंता पा.पु.विभाग श्री. काकडे :- या सभेमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता व पी.एम.सी श्री.ए.ए.मुळे या योजनेची माहिती देतील.

मा.उपायुक्त श्री दराडे :- श्री.मुळे माहिती दया.

उपअभियंता म.जी.प्रा श्री.मुळे (PMC) :- हि केंद्र शासनाची योजना असून सन १५-१६ मध्ये या योजनेस मंजूरी मिळाली आहे.

मा.श्री.संजय शेंडगे :- उपनगर,शहरास ही योजना पुर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठया मध्ये किती प्रमाणात सुधारणा होईल.

कनिष्ठ अभियंता पा.पु.विभाग श्री. काकडे :- शहर पाणीपुरवठा सुरळीत व मुबलक होण्याच्या दृष्टीने सध्या फेज -२ मधील वाढीव काम अमृत योजने मध्ये समाविष्ठ केल्याने पुढील ३० ते ३५ वर्ष पाण्याचा प्रश्न मार्गीलागाणार आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- या योजने करिताच्या निविदेची माहिती सांगा.

उपअभियंता म.जी.प्रा श्री.मुळे (PMC) :- या कामा करिता निविदा प्रसिध्द करून ई - टेंडरीग केले आहे.सुरूवातीला निविदा प्रसिध्द झाल्या नंतर दोन वेळेस निविदेस प्रतीसाद मिळाला नाही.त्यानंतर मुदतवाढी मध्ये "तापी प्रिस्टेस प्रॉडक्ट जे.व्ही." यांची कमी दराची निविदा प्राप्त झाली.सदर संस्थेस काळया यादीत टाकल्याने सदर कामाची फेर निविदा प्रसिध्द करण्यात आली.या कामासाठी अद्याप

पर्यंत ३ वेळा निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.यामध्ये मे. ऑफशोअर इन्फ्रास्ट्रक्चर यांनी सादर केलेला देकार हा जास्त असल्याने त्यांची निविदा नाकारण्यात येवून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्राप्त झालेली निविदा ही मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. यांनी सादर केली.

मा.सभापती साहेब :- सदर योजना एकुण किती रक्कमेची आहे व यास निधी कसा प्राप्त होणार आहे.

उपअभियंता म.जी.प्रा श्री.मुळे (PMC) :- "अमृत " अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामांची ई निविदा क्र. १५२० मंजूर किमत रू. १००. ४४ कोटी आहे. या योजने करीता मा.केंद्र शासना कडून ५० टक्के राज्य शासनामार्फत २५ टक्के व मनपा हिस्सा २५ टक्के या प्रमाणे योजनेचा खर्च उभारणी करण्यात येणार आहे.

मा.श्री.दत्ता कावरे :- निविदा ७ टक्के जादा दराने आल्या मुळे या योजनेचा खर्च किती वाढला ? वाढीव खर्च कसा उपलब्ध होणार.

उपअभियंता म.जी.प्रा श्री.मुळे (PMC) :-"अमृत " अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामांची ई निविदा क्र. १५२० मंजूर किमत रू. १००. ४४ कोटी आहे. मा.आयुक्त, म.न.पा. यांचे स्तरावर झालेल्या वाटाघाटीनुसार अंतीम देकाराची किंमत ७.०० % जादा दराने त्यामुळे कंत्राटदाराने ७.०० % निविदा जास्त दराने भरलेला असल्याने वाढीव देकारामुळे होणारा वाढीव खर्च रू. ७.०१ कोटी ही रक्कम अहमदनगर महानगरपालिकेला स्वत: च्या निधीमधून उभारावी लागेल.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- काम करण्यास ठेकेदार संस्था तयार होत नाही.त्या मुळे विकास कामांना खिळ बसते.पाण्याचा प्रश्न नगरशहरास अत्यंत महत्वाचा आहे.उन्हाळयात उपनगरातील व शहरातील नागरीकांचे मोर्चे महानगरपालिकेवर येतात.रात्री अपरात्री पाणी येत असल्याने महिला भगीनीचे हाल होत आहे.अशा या महत्वकांक्षी योजने करीता वेळोवेळी निविदा प्रसिध्द करण्यात आली.वरंवार मुदतवाढ देण्यात आली.त्यानंतर एकच निविदा प्राप्त झाली आहे. निधी अभावी ही योजना रखडवू नका. वेळ पडल्यास मनपा निधी मधून हा खर्च करावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- महानगरपालिकेची अर्थीक परिस्थिती चा विचार करता या योजनेचा वाढीव खर्च मा.राज्य शासना कडे मागणी करून या करीता पाठपुरवा करावा. महानगरपालिकेने अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन खर्च करण्यात यावा किंवा मनपा फंडातुन हा वाढीव खर्च करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सदर योजने करीता वाढीव निधी करीता मा.राज्य शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करून घ्यावा.किंवा अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन करण्यात यावा.

मा.श्री.संजय शेंडगे :- सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव तात्काळ राज्यस्तरीय निविदा समितीकडे पाठविण्यात यावा.

मा. सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दि.१३ ऑक्टोबर २०१५परिपत्रका मधील ब जिल्हा स्तर, अमृत अभियानाच्या अंमलबजावणीबाबत जिल्हास्तर आढावा संनियत्रण समिती ,अमत अभियानाअंतर्गत प्रकल्पांच्या प्रगतीचा व अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर मा.जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचे सदर शासन निर्णयात नमुद आहे.

संबंधित जिल्हाचे जिल्हाधिकारी - अध्यक्ष,संबंधित जिल्हातील अभियान शहराचे महापौर/नगराध्यक्ष सह अध्यक्ष,संबंधित जिल्हातील अभियान शहरांचे आयुक्त/ मुख्याधिकारी सदस्य,संबंधित जिल्हातील संबंधित अंमलबजावणी यंत्रणेचे प्रतिनिधी,सदस्य ,जिल्हा प्रशासन अधिकारी,सदस्य सचिव असे परिपत्रकामध्ये नमुद आहे.

कनिष्ठ अभियंता पा.पु.विभाग श्री. काकडे :- या बाबत आपल्या कडे कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही

मा. सहाय्यक आयुक्त श्री. दराडे :- मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम ,मा.उपमहापौर यांनी दिनांक ०३/०७/२०१७ रोजी पत्र देवून मा.श्री.संतोषकुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांनी दिनांक २७ २७ जुन २०१७ च्या पत्रानुसार सदरची निविदा निविदा दरापेक्षा जास्त असल्याने राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यास सांगितलेले आहे.

कनिष्ठ अभियंता पा.पु.विभाग श्री.काकडे :- याबाबत राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत निर्णयास्तव पाठविण्यांत येणार आहे.

मा.सभापती साहेब :- मा.केंद्रशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम ई - निविदा क्र.१५२० चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व त्यांचेशी वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार निविदे बाबतच्या म.जी.प्रा. च्या अहवालामध्ये केलेल्या शिफारसी नुसार मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. यांनी ७.०० % जादा दराने सादर केलेला अंतीम देकाराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

म.जी.प्रा.चे प्राप्त अहवाला नुसार सदर निविदेस रू. ७.०१ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार आहे. सदरचा निधी म.न.पा.स अतिरिक्त उभारावा लागणार असून वाढीव निधी करीता मा.राज्य शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करून घ्यावा.नगरवासयींकरीता अत्यंत महत्वकांक्षी योजना असून ही योजना पुर्णत्वास नेणे अत्यंत आवश्यक असल्याने महानगरपालिकेने अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन खर्च करण्यात यावा किंवा मनपा फंडातुन हा वाढीव खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा प्रस्ताव मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा.यांचे प्राप्त अभिप्रायानुसार सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव तात्काळ राज्यस्तरीय निविदा समितीकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

---*---

**ठराव :-**

मा.केंद्रशासित 'अमृत' अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम ई - निविदा क्र.१५२० चे व्यापारी लिफाफया मधील प्राप्त दर व त्यांचेशी वाटाघाटीनंतर दिलेले दर व मा. छाननी समितीने शिफारस केलेनुसार निविदे बाबतच्या म.जी.प्रा. च्या अहवालामध्ये केलेल्या शिफारसी नुसार मे. शोनन इंजिनिअरींग वर्क्स प्रा.लि. यांनी ७.०० % जादा दराने सादर केलेला अंतीम देकाराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

म.जी.प्रा.चे प्राप्त अहवाला नुसार सदर निविदेस रू. ७.०१ कोटी इतका जास्तीचा खर्च येणार आहे. सदरचा निधी म.न.पा.स अतिरिक्त उभारावा लागणार असून वाढीव निधी करीता मा.राज्य

शासनाकडे तात्काळ प्रस्ताव सादर करून निधी उपलब्ध करून घ्यावा.नगरवासयींकरीता अत्यंत महत्वकांक्षी योजना असून ही योजना पुर्णत्वास नेणे अत्यंत आवश्यक असल्याने महानगरपालिकेने अन्य उपलब्ध असलेल्या उचित निधीतुन खर्च करण्यात यावा किंवा मनपा फंडातुन हा वाढीव खर्च करण्यास ही सभा मान्यता देतआहे.

सदरचा प्रस्ताव मा. सदस्य सचिव, म.जी.प्रा.यांचे प्राप्त अभिप्रायानुसार सदर निविदे संदर्भात राज्यस्तरीय निविदा समितीच्या बैठकीत निर्णय होणे आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव तात्काळ राज्यस्तरीय निविदा समितीकडे पाठविण्यास ही सभा मान्यता देत आहे. मा.शासनाने जी.एस.टी.बाबत जे आदेश काढले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.
नियमानसुर पुढील कार्यावाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय छगनराव शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २१ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :** इलेक्ट्रीकल सुपरवायझर, इलेक्ट्रीक विभाग यांचे कडील जा.क्र. विद्युत विभाग १५ दिनांक १३/०४/२०१७ अन्वयेचा अहवाल.

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावित सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीकल सुपरवायझर, इलेक्ट्रीक विभाग यांनी संदर्भिय प्रस्ताव सादर करुन इलेक्ट्रीक विभागा करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदांवर सुभाष बापुराव सुळ व इतर १० यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.०६/०५/२०१७ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये इलेक्ट्रिक सुपरवायझर यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ४८४ दिनांक १४ / १० / २०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ४९५६ दिनांक ०९ / ११ / २०१६ व जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ४९५७ दिनांक ०९/११/२०१६ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशानुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/११/२०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात येवुन सदरच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. १३३ दिनांक १०/११/२०१६ अन्वये मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ९६ दिनांक १७/१२/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे. त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये संबधितांची करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ७ | महारपुडे कैलास भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | जा.क्र. ४९५७ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.४९५६ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.४९५६ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.४९५६ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | जा.क्र.४९५६ दि.०९/११/२०१६ | ०३/११/२०१६ ते ०२/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |

वरील संबधितांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक ०३ /०५/२०१७ पासुन समाप्त होणार आहे.

त्यामध्ये पान नं. १९ वरील विवरण पत्र क्रमांक २४ मध्ये अनु. क्र. ५ नुसार आस्थापना कायम सुचीवर विद्युत विभागासाठी वायरमन / तारतंत्री - ३० इतकी मंजुर पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | एकुण पदे | सद्यस्थिती मध्ये कायम पदांवर कार्यरत पद संख्या | सद्यस्थितीमध्ये मानधनावरील कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वायरमन / तारतंत्री | ३० | १३ | १२ |

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७ , शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील परिशिष्ट २ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता नमुद केलेली आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ४८ | तांत्रिक सेवा | वायरमन / तारतंत्री | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परीक्षा उर्तिर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री अभासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधना वरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. ०६ / ०५ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये १,०४,५००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये ६,२७,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ७ | महारपुडे कैलास भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ८ | अंकित किशोर कासवा | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ९ | शेख अजिज सत्तार | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| १० | जावळे अनिल श्रीरंग | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |
| ११ | शिंदे महेश अर्जुन | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रिक विभाग |

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र.सहाय्यक आयुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सन २०१७-१८ अंदाजत्रकीय तरतुद,मा.शासन निर्णय,परिपत्रके,मनपा अधिनियम,मनपा विधीतज्ञ, यांचे अभिप्रायांनी प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.वरील अ प्रमाणे कार्यवाहीसाठी सादर.

मा.उपायुक्त रजेवर

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, अ नुसार सोबतच्या अहवाला प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ब्लड बॅकेकरीता ज्या जागा भरावयाच्या आहेत त्याला आकृतीबंध मध्ये मंजूरी आली आहे का?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मंजूरी आली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये महिलेचा मृत्यु झाला.जर दवाखान्यात कायम स्वरूपी डॉक्टर उपलब्ध असते तर ही घटना टळली असती.

वैदयकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- लॅब टेक्नीशियन व नर्सेस ही पदे रिक्त आहे.ती जागा आपण कंत्राटी पध्दतीने भरतो.त्यांचे मानधन वेळेवर मिळत नसल्याने लोक टिकून रहात नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बिंदू नामावलीमध्ये १२ जागा मंजूर आहे.८ जागा भरल्या आहेत.उर्वरित ४जागा बाबत तुम्ही प्रस्ताव दया.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- या बाबत डिमांड आल्यावर मा.शासनाची मंजूर घेवून कार्यवाही करावी लागेल.

वैदयकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- आजच प्रस्ताव सादर करण्यात येईल.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- मा.स्थायी समिती कडे कचरा संकलन ,वाहतुक व्यवस्था करणे करीता भाडेतत्वावर ट्रॅक्टर उपलब्ध करणे बाबत व कचरा कुंडी वरील कचरा संकलन करून डेपो पर्यत वाहतुक करणे करीता भाडोत्री डंपर लावणे बाबतचे दोन प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आले आहे.सदर प्रस्तावातील विषय हे तातडीचे असून या प्रस्तावास आजच्या सभेमध्ये मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- या दोन्ही प्रस्तावांची माहिती देण्यात यावी.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी ट्रॅक्टर ट्रॉली भाडेतत्वार लावण्यात आल्या असून या कामाची मुदत दि.५/६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत आहे.त्यानुसार कामाची निकट पहाता सदर एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यात आले असुन सदर कामी दि.१०/६/१७ पासुन प्रभागातील ११ भाडोत्री ट्रॅक्टरची कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.तसेच ही कार्योत्तार मंजूर अल्पमुदतीची असल्याने पुढील सहा महिन्या करीता मुदतवाढ देण्यात यावी.

घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहर रॅम्प व बुरूडगांव कचरा डेपोपर्यत शहर रॅम्प वरून कचरा संकलन व वाहतुकीसाठी दैनंदिन चार भाडोत्री डंपर लावणेकामी या कामाची मुदत ९/६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार कामाची निकट पहाता एक महिन्याकरीता कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.पुढील दोन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात यावी.ठेकेदार संस्थेने विभागाकडे दर वाढीकरीता मागणी केली असून दरवाढ न केल्यास डंपर पुरविण्यात येणार नाही.या बाबत वेळोवेळी तोंडी कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग/घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे करीता कामाची मुदत दि.१४/७/२०१७ रोजी मुदत संपणार आहे.मुदत संपण्याकरीता काही दिवसांचा कालावधी शिल्लक असून प्रशासकिय सोपस्कार पुर्ण होणार नाहीत.त्यामुळे याच सभेमध्ये या कामा करीता कामाची निकड पहाता सहा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी ट्रॅक्टर ट्रॉली भाडेतत्वार लावण्यात आल्या असून या कामाची मुदत दि.५/६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत आहे.त्यानुसार कामाची निकट पहाता सदर एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यात आले असुन सदर कामी दि.१०/६/१७ पासुन प्रभागातील ११ भाडोत्री ट्रॅक्टरची

कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.तसेच ही कार्योत्तार मंजूर अल्पमुदतीची असल्याने पुढील सहा महिन्या करीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहर रॅम्प व बुरूडगांव कचरा डेपोपर्यत शहर रॅम्प वरून कचरा संकलन व वाहतुकीसाठी दैनंदिन चार भाडोत्री डंपर ची मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार कामाची निकट पहाता एक महिन्याकरीता कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.पुढील दोन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात यावी.या दोन महिन्याच्या काळात निविदा प्रसिध्द करण्यात यावी.

शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे करीता कामाची.मुदत संपण्याकरीता काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहील्याने याच सभेमध्ये या कामा करीता कामाची निकड पहाता सहा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर कालावधीतील केलेल्या मानधना वरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. ०६ / ०५ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे. शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी ट्रॅक्टर ट्रॉली भाडेतत्वार लावण्यात आल्या असून या कामाची मुदत दि.५/६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत आहे.त्यानुसार कामाची निकट पहाता सदर एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यात आले असुन सदर कामी दि.१०/६/१७ पासुन प्रभागातील ११ भाडोत्री ट्रॅक्टरची कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.तसेच ही कार्योत्तार मंजूर अल्पमुदतीची असल्याने पुढील सहा महिन्या करीता मुदतवाढ देण्यात येत आहे. व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहर रॅम्प व बुरूडगांव कचरा डेपोपर्यत शहर रॅम्प वरून कचरा संकलन व वाहतुकीसाठी दैनंदिन चार भाडोत्री डंपर ची मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार कामाची निकट पहाता एक महिन्याकरीता कार्योत्तर मंजूरी व .पुढील दोन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात येत आहे.या दोन महिन्याच्या काळात निविदा प्रसिध्द करण्यात यावी.तसेच शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे करीता कामाची.मुदत संपण्याकरीता काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहील्याने याच सभेमध्ये या कामा करीता कामाची निकड पहाता सहा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदांवर कालावधीतील केलेल्या मानधना वरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. ०६ / ०५ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे..ऑफिस रिपोर्ट मंजूर,

सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार शहरातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी ट्रॅक्टर ट्रॉली भाडेतत्वावर लावण्यात आल्या असून या कामाची मुदत दि.५/६/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत आहे.त्यानुसार कामाची निकट पहाता सदर एजन्सीस कार्यारंभ आदेश देण्यात आले असुन सदर कामी दि.१०/६/१७ पासुन प्रभागातील ११ भाडोत्री ट्रॅक्टरची कार्योत्तर मंजूरी व सहा महिन्या करीता मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे व घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता शहर रॅम्प व बुरूडगांव कचरा डेपोपर्यत शहर रॅम्प वरून कचरा संकलन व वाहतुकीसाठी दैनंदिन चार भाडोत्री डंपर ची मुदत संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार कामाची निकट पहाता एक महिन्याकरीता कार्योत्तर मंजूरी व पुढील दोन महिन्या करीता मुदतवाढ देण्यात येत आहे.या दोन महिन्याच्या काळात निविदा प्रसिध्द करण्यात यावी.तसेच शहरात निर्माण होणा-या कच-याचे म.न.पा.च्या वाहनामार्फत संकलन व वाहतुक करणेकरीता कंत्राटी पध्दतीने वाहन चालक पुरविणे करीता कामाची.मुदत संपण्याकरीता काही दिवसांचा कालावधी शिल्लक राहील्याने याच सभेमध्ये या कामा करीता कामाची निकड पहाता सहा महिन्याकरीता मुदतवाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २२ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :** रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग १८ दि. २५/०४/२०१७ अन्वयेचा अहवाल.

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावित सादर करण्यात येतो की, रक्त संक्रमण अधिकारी यांनी संदर्भिय प्रस्ताव सादर करुन रक्तपेढी विभागा करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी श्रीमती मोरे पल्लवी दगडु यांना तांत्रिक खंड देऊन दि. १२ / ०६ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. रक्तपेढी विभाग १३७ दिनांक १८ / १० / २०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक ०९ / १२ / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननेमणूक करणे बाबत सुचीत केलेले होते. त्यानुषंगाने सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. १४६ दिनांक २३/११/२०१६ अन्वये मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ९४ दिनांक १७/१२/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती. त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये संबधितांची करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | जा.क्र.६७३१ दि.१०/०२/२०१७ | ०९/१२/२०१६ ते ०८/०६/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |

वरील संबधितांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक ०९ / ०६ / २०१७ पासुन समाप्त होणार आहे.

मा. महाराष्ट्र शासनाने अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता दिलेली असुन त्यामध्ये पान नं. २३ वरील विवरण पत्र क्रमांक ३० मध्ये अनु. क्र. ३ व ४ नुसार रक्तपेढी विभागासाठी लॅब टेक्निशियन, लॅब असिस्टंट या पदांची मंजुर संख्या व त्यानुसार शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | पदाचा तपशिल | मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|
| ३ | लॅब टेक्निशियन | ४ | ---- | ४ |
| ४ | लॅब असिस्टंट | --- | ४ | ४ |

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीकरीता शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|
| १०४ | आरोग्य सेवा श्रेणी - ३ | लॅब टेक्निशियन | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची रसायन शास्त्र , जिवशास्त्र वा सुक्ष्मजीव शास्त्र या विषयातील पदवी. ब) मान्यता प्राप्त संस्थेची डी एम एल टी परीक्षा उर्तीर्ण. क) वैद्यकीय प्रयोगशाळेतील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| १०५ | आरोग्य सेवा श्रेणी - ३ | लॅब असिस्टंट | अ) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उर्तीर्ण.ब) मान्यता प्राप्त संस्थेची D.M.L.T. पदविका. क) शास्त्र शाखेची पदवीधर आणि डी.एम.एल. टी. पदविका धारकास प्राधान्य. |

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | बी.एस.सी. , डी.एम.एल.टी. |

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक १२ / ०६ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झ ााल्यास दरमहा रुपये १६,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये ९६,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,आस्थापना विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावित प्रकरणी अंदाजपत्रामधील तरतुद,मंजूर आकृतीबंध अंमलबजावणी कालावधी विचारात घेवून महाराष्ट्र मनपा अधिनियीम २०१२ चे कलम ५३ नुसार अ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्रीमती कलावती शेळके :- पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी पुर्ननियुक्ती दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती कलावती शेळके सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २३ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट
**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ : बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र.सार्व.बांधकाम विभाग २४८ दि. १९ / ०४ / २०१७ अन्वयेचा अहवाल.

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावित सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग यांनी संदर्भिय प्रस्ताव सादर करुन बांधकाम विभागाकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी पडोळे राहुल शंकर यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत व श्री. सचिन शिवाजी जाधव हे हजर नसल्याने त्यांच्या ऐवजी इतर कंत्राटी अभियंत्यांची नेमणूक करणे बाबत नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये आस्थापना विभागामार्फत अहमदनगर महानगरपालिकेतील विविध विभागा करीता तांत्रिक पदांवर ठेका पध्दतीने सेवा अभिकर्त्यामार्फत बाह्ययंत्रणेद्वारे (Outsourcing) राबविणे बाबत सदरचा मसुदा वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्दी करणेस मंजुरी करीता मा.उपायुक्त (सा) यांचेकडे सादर करण्यात आलेला असुन सदर मसुदाच्या प्रस्तावास मान्यता प्राप्ती नंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही ही तातडीने करण्यात येईल. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये नविन कनिष्ठ अभियंता (सिव्हील) मानधनावर नेमणे ऐवजी बाह्ययंत्रणेद्वारे बांधकाम विभागास त्यावेळेस तातडीने उपलब्ध होईल.

सद्यस्थितीमध्ये बांधकाम विभाग यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग १२८३ दि.१९/०९/२०१६ व १३९३ दि.६/१०/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनेमणूक करणे बाबत सुचीत केलेले होते. त्यानुषंगाने सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. १४३ दिनांक २३/११/२०१६ अन्वये मा. स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ९३ दिनांक १७/१२/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती. त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये संबधितांची करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहुल शंकर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | जा.क्र.६७३२ दि.१०/०२/२०१७ | २४/११/२०१६ ते २३/०५/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |

वरील संबधितांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक २४ / ०५ / २०१७ पासुन समाप्त होणार आहे.

मा.महाराष्ट्र शासनाने अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता दिलेली असुन त्यामध्ये पान नं. १६ वरील विवरण पत्र क्रमांक २१ मध्ये अनु.क्र.५ नुसार शहर अभियंता(स्थापत्य) विभागासाठी कनिष्ठ अभियंता (सिव्हील)-८ इतकी पद मंजुर संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

तसेच मा. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब , शनिवार , फेब्रुवारी ६, २०१६ / माघ १७, शके १९३७ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या आवश्यक शैक्षणिक पात्रतेस मान्यता दिलेली असुन त्यामधील पान नं. २० वरील परिशिष्ट २ मध्ये अनु.क्रं. ४८ मध्ये खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता व नेमणुकीची पध्दत नमुद केलेले आहे.

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकी करीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१. नामनिर्देशन<br>२. पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा | नेमणुकीकरीता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४८ | अभियांत्रिकी सेवा श्रेणी -३ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | नामनिर्देशन १०० % | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदविका.<br>ब) ३ वर्षाचा संबधित कामाचा अनुभव.<br>किंवा<br>क) स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी परीक्षा उर्तीर्ण. |

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक २६ / ०५ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पडोळे राहुल शंकर | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर अंतर्गतलेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ प्रमाणे मानधनावर पुर्ननियुक्ती करावी किंवा कसे या बाबत आस्थापना विभाग प्रमुख व मुख्यलेखाअधिकारी यांना स्पष्ट अभिप्राय घेवून सादर करावे. वरील अ प्रमणे कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त (सा) मागील पृष्ठावरील अ नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.सुनिता भिंगारदिवे :- पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये आजच बायोक्लीन सिस्टीम इंडीया प्र.ली.यांना महानगरपालिकेच्या जैव - वैदयकीय कचरा संकलन व विल्हेवाट प्रकल्पाची मुदतवाढ मिळणे बाबत अर्ज दिला असून.यावर चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक असून सदर संस्थेची मुदत संपत आली आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- जैव - वैदयकीय कचरा संकलन व विल्हेवाट प्रकल्पाचे काम अत्यावाश्यक असून सदर संस्थेचे काम चांगल्या प्रकारचे आहे.या बाबत माहिती देण्यात यावी.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- बायोक्लीन सिस्टिमस (इंडिया) या संस्थेस दि.५/९/२००३ पासुन पंधरा वर्षाकरीता बी.ओ.टी.तत्वावर देण्यात आला असून यामध्ये महानगरपालिकेच्या हद्दीती सर्व दवाखाने,प्रसुतिगृहे,हॉस्पीटल,नर्सिग होम्स,प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता देण्यात आलेला आहे.सदर संस्थेची मुदत जुलै २०१८ मध्ये संपत आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- मुदत संपण्यास एक वर्ष बाकी आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- सदर संस्थेचे काम चांगल्या प्रकारचे आहे.ही संस्था महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार करीत असल्याने त्यांच्या सुचनेनुसार वेळोवेळी पालन करीत आल्याने मशिनरीमध्ये बदल केले आहे.त्यामुळे प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून महानगरपलिकेस एकही तक्रार अथवा नोटिस प्राप्त झालेली नाही.प्रदुषन नियंत्रण मंडळ यांचे कडून दि.२८ मार्च २०१६ रोजी नविन आदयादेशानुसार कचरा संकलन व विल्हेवाट नियमावली २०१६ जारी करण्यात आली असून त्याची पुर्तता पुढील २ वर्षामध्ये करावायाची आहे.नविन आदयादेशानुसार प्रकल्पामध्ये बदल करावयाचा झ ाल्यास या संस्थेस रक्कम रू.६०लाख खर्च येणार आहे. त्यामुळे सादर संस्थेस मुदत वाढ दिल्यास ही संस्था खर्चाची जबादारी घेवून प्रदुषन नियंत्रण मंडळ यांचे कडून दि.२८ मार्च २०१६ रोजी नविन आदयादेशानुसार प्रकल्पातील बदल पुर्ण करील.

मा.श्री.दिलीप सातपुते :- नविन आदयादेशानुसार कार्यवाही करायची असल्यास कीती कालावधी लागेल.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- सदरच्या संस्थेची मुदत जुलै २०१८ मध्ये संपत आहे.हि मुदत संपल्या नंतर नविन अदयादेशानुसार कार्यवाही करायची म्हटल्यास किमान एक वर्षाचा कालावधी लागु शकतो.या काळामध्ये दवाखाने,प्रसुतिगृहे,हॉस्पीटल,नर्सिग होम्स,प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे जिकरीचे होणार आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा.सभापती साहेब :- दिनांक १०/४/२०१७ रोजीच्या सभेमध्ये लेखापरिक्षण अहवालावरील चर्चे मध्ये तत्कालीन उपायुक्त श्री.बहेरे साहेब यांनी मुदतवाढ देणे करीता भुमीका मांडली होती.त्यानुसार मुख्यलेखापरिक्षक यांनी या बाबत माहिती दयावी.

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनीस बायो मेडीकल वेस्टची विल्हेवाट करणेबाबत दि.२८/७/२००३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून १५ वर्षाचा करार करण्यात आला आहे. कार्यारंभ आदेश दि.२८/७/२००३ मधील अट क्र.२ नुसार "१५ वर्षानंतर सदरचा प्रस्ताव प्रकल्प पुढे चालविण्याबाबत महानगरपालिकेने घेतलेला निर्णय अंतिम राहील" अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार व खरेदी, सेवा पुरवण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील "खरेदी कार्यपध्दती नियमपुस्तिका" परिच्छेद ३.३.२ (अ) मधील पुर्नप्रत्ययी आदेशाबाबतच्या तरतुदीनुसार पुन्हा नव्याने ई - निविदा प्रक्रिया करून नवीन एजन्सी निश्चित करण्याऐवजी करारास्थित एजन्सीला मुदतवाढ देणे आर्थिक दृष्टया 'किफायतशिर' ठरत असल्याने बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या एजन्सीला ७.५ वर्ष मुदतवाढ देता येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- .प्रदुषन नियंत्रण मंडळ यांचे कडून दि.२८ मार्च २०१६ रोजी नविन आदयादेशानुसार कचरा संकलन व विल्हेवाट नियमावली २०१६ जारी करण्यात आली असून त्याची पुर्तता म्हणजे नक्की काय करणार

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- सदर नियमावली नुसार प्रकल्प व कामकाजा मध्ये १. वायु प्रदुषण नियंत्रण व मोजमाप करण्याकरीता ऑनलाईन मॉनिटरिंग सिस्टीम चिमणीला बसविणे.२. इन्सिरेटरचे तापमान मोजण्यासाठी व नियंत्रण करण्यासाठी ऑनलाईन PLC कंन्ट्रोलप्यान्वेल बसविणे.३.जैव - वैद्यकीय कचरा इन्सिरेटरमध्ये भरण्यसाठी स्वयंचलीत यंत्रणा बसविणे. इन्सिरेटर मध्ये बदल करणे इ.एकुणे ९ प्रकारचे बदल करण्यात येणार आहे.

मा.सभापती साहेब :- मुदतवाढ दिल्यास .प्रदुषन नियंत्रण मंडळ यांचे नियमानुसार तुम्ही सांगीतल्यानुसार कामे होतील का.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- सदरच्या संस्थेने दि.३/५/२०१७ रोजी रक्कम रूपये ५लाख ५० हजार रूपयांची बॅक गॅरंटी व दि.१२/८/२०१६ रोजी यंत्रणे करीता आगावू रक्कम भरून ऑर्डर दिली आहे.या कामी त्यांनी महाराष्ट राज्य प्रदुषण मंडळास प्रतिज्ञापत्रा व्दारे यंत्रणा तात्काळ बसविण्यात येईल असे कळविले आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- नियमावली नुसार बदल करावयाचा असल्सास किती खर्च अपेक्षीत आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- अंदाजे रू.६० ते ७० लाख रूपये खर्च अपेक्षीत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपलिकेस या पासून कीती उत्पन्न मिळते.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- महानगरपालिकेस या पासून रॉयल्टी पोटी उत्पन्न मिळते.

मा.सभापती साहेब :- सदर संस्था वेळेमध्ये रॉयल्टी जमा करते का.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- हो प्रत्येक महिन्याला हि रक्क्म वेळेवर जमा करण्यात येते.

मा.सभापती साहेब :- अर्जामध्ये डॉक्टरांना आकारण्यात येणा-या दरामध्ये वाढ करण्याची मागणी केली आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- सध्याचा दरा बाबत माहिती सांगा.

वैदयकीय आरोग्यअधिकारी श्री.बोरगे :-मागील दर हे सन२००३मध्ये म्हणजेच १५वर्षापुर्वी ठरले होते.करारनाम्या मध्ये दर तिन वर्षा मध्ये १० टक्के वाढ झाली आहे.सन २००३ पासुन आजपर्यत ५० टक्के वाढ झाली आहे ही तत्कालीन दरा नुसार झाली आहे.अर्जामध्ये नमुद केल्या नुसार सन २००३ मधील दरानुसार महागाई,इंधन,कामगारांचे पगार.त्यामुळे सध्याच्या दरामध्ये ३० टक्के वाढ करून पुढील प्रत्येक २वर्षानी त्यामध्ये १० टक्के वाढ करण्याची मागणी केली आहे. रू.६० लाख खर्च करून मशिनरी आणणार आहे.त्यानुसार सध्याचे दर हे अल्पवाटत आहेत असुन मागणी नुसार दरवाढ करणे उचित वाटते.

मा.दिलीप सातपुते :- सन २००३ पासुन संस्था काम करत असल्साने जैव - वैदयकीय कचरा संकलन व विल्हेवाट प्रकल्पाचे काम हे विश्वासनिय असल्याचे दिसुन येते.तसेच सदर संस्थेबाबत कोणत्याही दवाखान्याची,.प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागरीकांची,न्यायालय यांचेकडून महानगरपालिकेस यांच्या कामाकाजाबाबत तक्रार नसल्याने सदर संस्थेस मुदतवाढ व त्यांच्या अर्जा नुसार दरवाढ देण्यात यावी.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :-जैव-वैद्यकीय कच-याची विल्हेवाट हा विषय शहरातील नागरीक,डॉक्टर,प्रदुषण इ. दृष्टीने अत्यंत महात्वाचा असून याची व्यवस्थीत विल्हेवाट झाली नाही तर नागरीकांना आरोग्याला धोका निर्माण होवू शकतो.सध्या काम करीत असलेली बायोक्लीन सिस्टीम इंडीया प्र.ली ही संस्था चांगल्या प्रकारची सेवा देत आहे.त्यामुळे यासंस्थेस मुदतवाढ देण्यात यावी.तसेच येथुन पुढे नियमानुसार चांगली सेवा देण्याच्या दृष्टीने जी अल्पदरवाढ संस्थेने सुचविली आहे ती मान्य करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठी ऑफिस रिपोर्ट करण्याच्या ऑफीस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

सभेमध्ये बायोक्लीन सिस्टीम (इंडिया)प्रा.ली. या संस्थेने दिलल्या अर्जानुसार व त्यावर झालेल्या चर्चेनुसार बायोक्लीन सिस्टिमस (इंडिया)या संस्थेस दि.५/९/२००३पासुन पंधरा वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आला असून यामध्ये महानगरपालिकेच्या हद्दीती सर्व दवाखाने, प्रसुतिगृहे, हॉस्पीटल, नर्सिग होम्स,प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी काम करीत आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कडून दि.२८ मार्च २०१६ रोजी नविन आदयादेशानुसार कचरा संकलन व विल्हेवाट नियमावली २०१६ जारी करण्यात आली असून त्याची पुर्तता करणे अत्यावश्यक असल्याने. संस्थेने सदर नियमावली नुसार प्रकल्प व कामकाजा मध्ये एकुण ९ प्रकारचे बदल करणे करीता रक्कम रूपये ५लाख ५० हजार रूपयांची बॅक गॅरंटी व यंत्रणे करीता आगावू रक्कम भरून ऑर्डर दिली आहे.या बाबतचे महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळास प्रतिज्ञापत्रा व्दारे यंत्रणा तात्काळ बसविण्यात येईल असे कळविले आहे.

मे.बायोक्लीन सिस्टीम (इंडिया)प्रा.लि.या कंपनीस बायोमेडीकल वेस्टची विल्हेवाट करणेबाबत दि.२८/७/२००३रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून १५वर्षाचा करार करण्यात आला आहे. कार्यारंभ आदेश दि.२८/७/२००३ मधील अट क्र.२ नुसार "१५ वर्षानंतर सदरचा प्रस्ताव प्रकल्प पुढे चालविण्याबाबत महानगरपालिकेने घेतलेला निर्णय अंतिम राहील" अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार व खरेदी,सेवा पुरवण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील"खरेदी कार्यपध्दती नियमपुस्तिका"परिच्छेद३.३.२(अ)मधील पुर्नप्रत्ययी आदेशा बाबतच्या तरतुदीनुसार पुन्हा नव्याने ई - निविदा प्रक्रिया करून नवीन एजन्सी निश्चित करण्याऐवजी करारास्थित एजन्सीला मुदतवाढ देणे आर्थिक दृष्टया "किफायतशिर" ठरत असल्याने मे.बायोक्लीन

सिस्टीम (इंडिया)प्रा.लि.या एजन्सीला ७.५वर्ष मुदतवाढ व बायोक्लीन सिस्टिम(इंडिया) प्रा.ली. या संस्थेस डॉक्टरांकडून आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २वर्षानी त्यामध्ये १०टक्के दरवाढ करण्यास देण्यांस ही सभा मान्यता देत आहे.प्रस्तूत कार्यवाहीस धोरणात्मक बाब असल्याने मा.महासभेची मंजूरी घेणेबाबत संबंधित विभागाने सदरची कार्यवाही करावी.

**ठराव:-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तातपुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)यापदी दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत पुर्वमंजुरी मिळणेसाठीच्या ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

सभेमध्ये मे.बायोक्लीन सिस्टीम(इंडिया)प्रा.ली.या संस्थेने दिलल्या अर्जानुसार व त्यावर झालेल्या चर्चेनुसार बायोक्लीन सिस्टिमस (इंडिया)या संस्थेसदि.५/९/२००३पासुन पंधरा वर्षाकरीता बी.ओ.टी. तत्वावर देण्यात आला असून यामध्ये महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व दवाखाने, प्रसुतिगृहे, हॉस्पीटल, नर्सिग होम्स,प्रयोगशाळा,इत्यादीपासून गोळा होणारा जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी काम करीत आहे. प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून दि.२८/३/२०१६ रोजी नविन अदयादेशानुसार कचरा संकलन व विल्हेवाट नियमावली २०१६जारी करण्यात आली असून त्याची पुर्तता करणे अत्यावश्यक असल्याने. संस्थेने सदर नियमावली नुसार प्रकल्प व कामकाजा मध्ये एकुण ९ प्रकारचे बदल करणे करीता रक्कम रूपये ५लाख५०हजार रूपयांची बॅक गॅरंटी व यंत्रणे करीता आगावू रक्कम भरून ऑर्डर दिली आहे.या बाबतचे महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळास प्रतिज्ञापत्रा व्दारे यंत्रणा तात्काळ बसविण्यात येईल असे कळविले आहे.

मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनीस बायो मेडीकल वेस्टची विल्हेवाट करणेबाबत दि.२८/७/२००३ रोजी कार्यांरभ आदेश देण्यात आले असून १५ वर्षाचा करार करण्यात आला आहे. कार्यारंभ आदेश दि.२८/७/२००३ मधील अट क्र.२ नुसार "१५ वर्षानंतर सदरचा प्रस्ताव प्रकल्प पुढे चालविण्याबाबत महानगरपालिकेने घेतलेला निर्णय अंतिम राहील" अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार व खरेदी, सेवा पुरवण्याबाबतच्या महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील "खरेदी कार्यपध्दती नियमपुस्तिका" परिच्छेद ३.३.२ (अ) मधील पुर्नप्रत्ययी आदेशाबाबतच्या तरतुदीनुसार पुन्हा नव्याने ई - निविदा प्रक्रिया करून नवीन एजन्सी निश्चित करण्याऐवजी करारास्थित एजन्सीला मुदतवाढ देणे आर्थिक दृष्टया 'किफायतशिर' ठरत असल्याने बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या एजन्सीला ७.५ वर्ष मुदतवाढ व बायोक्लीन सिस्टिमस (इंडिया) प्रा.ली. या संस्थेस डॉक्टरांकडून जीव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २ वर्षानी त्यामध्ये १० टक्के दरवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रस्तूत कार्यवाहीस धोरणात्मक बाब असल्याने मा. महासभेची मंजूरी घेणेबाबत संबंधित विभागाने सदरची कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही/-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २४ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विषय : कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदावर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत पुर्व मंजुरी मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत.

संदर्भ : मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.२६ दि. दिनांक १५/०४/२०१७ अन्वयेचा अहवाल.

सादर,

उपरोक्त विषयान्वये प्रस्तावित सादर करण्यात येतो की, मुख्य वैद्यकिय अधिकारी, कै.बा.दे.दवा. यांनी संदर्भिय प्रस्ताव सादर करुन कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारिका यापदांवर सौ. नलु पोपट खराडे यांना तांत्रिक खंड देऊन दि. १० / ०२ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. कै. बा. दे. दवा. व सुतीका गृह ३७८ दिनांक २८ / ०७ / २०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदी संबधितांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक ०८ / ०८ / २०१६ पासुन पुढील सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननेमणूक करणे बाबत सुचीत केलेले होते. त्यानुषंगाने सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ११६ दिनांक २६/०९/२०१६ अन्वये मा.स्थायी समितीकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८८ दिनांक १७/१२/२०१६ अन्वये ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली होती. त्यानुषंगाने सद्यस्थितीमध्ये संबधितांची करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | परिचारीका | ६,०००/- | जा.क्र.६७३३ दि.१०/०२/२०१७ | ०८/०८/२०१६ ते ०७/०२/२०१७ अखेर सहा महिन्या करीता |

वरील संबधितांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत ही दिनांक ०८ / ०२ / २०१७ पासुन समाप्त होणार आहे.

मा. महाराष्ट्र शासनाने अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता दिलेली असुन त्यामध्ये पान नं. २२ वरील विवरण पत्र क्रमांक २९ मध्ये अनु. क्र. ९ व १० नुसार

रुग्णालय व आरोग्य सेवा विभागासाठी परिचारिका / सहाय्यक परिचारीका / प्रसविका या पदांची मंजुर संख्या व त्यानुसार शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे.

| अ. क्रं. | पदाचा तपशिल | पुर्वीचे मंजुर पदे | नवीन पदे | एकुण पदे | सद्यस्थिती मध्ये पदांवर कायम कार्यरत पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ९ | परिचारीका (जी.एन.एम) | १६ | -- | १६ | १४ |
| १० | सहाय्यक परिचारिका / प्रसविका (ए.एन.एम.) | ०३ | ०६ | ०९ | |
| एकुण | | १९ | ०६ | २५ | १४ |

| अ. क्रं. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीकरीता शैक्षणीक अर्हता |
|---|---|---|---|
| १११ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी - ३ | नर्स /परिचारीका | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची १२ वी विज्ञान शाखेची परिक्षा उर्तीर्ण. ब) महाराष्ट्र नर्सिग कौन्सीलची जनरल नर्सिंग व मिडवाईफरी या विषयाची पदविका. क) शासकीय / निमशासकीय खासगी रुग्णालयातील परिचारिका म्हणुन ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. ड) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |
| ११२ | निम वैद्यकीय सेवा श्रेणी -३ | नर्स (ए.एन.एम.) (मिडवाईफर/ नर्स (ए.एन.एम.) | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाची माध्यमिक शालांत परिक्षा उर्तीर्ण. ब) शासन मान्यता प्राप्त संस्थेचा ए. एन. एम. अभ्यासक्रम पुर्ण व त्यानंतर कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>क) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची नोंदणी आवश्यक. |

सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका यापदांवर अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावर करारबध्द नियुक्ती वरील दर्शविलेल्या संबधितांची शैक्षणिक अर्हता ही खालील प्रमाणे असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव | धारण केलेली शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | आर.ए.एन.एम. |

संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने कै.बा.दे.दवा.अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात परिचारीका या पदावर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक १० / ०२ / २०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये ३६,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | नलु पोपट खराडे | परिचारीका | ६,०००/- | कै.बा.दे.दवा. |

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी

यावर अंतर्गतलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,सन २०१७-१८ अंदाजपत्रामधील तरतुद मा.शासन निर्णय इ , परिपपत्रके,मनपा अधिनियम,मनपा विधितज्ञ यांचे अभिप्रयपुर्तीनंतर प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.
यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,नस्तीमध्ये पृष्ठ क्रमांक नमुद नाही.पुर्ण करावे.वरील अ प्रमाणे कार्यवाही करावी.

मा.उपायुकत रजेवर

यावर मा.अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केले प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ब्लड बॅकेकरीता ज्या जागा भरावयाच्या आहेत त्याला आकृतीबंध मध्ये मंजूरी आली आहे का?

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मंजूरी आली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये महिलेचा मृत्यु झाला.जर दवाखान्यात कायम स्वरूपी डॉक्टर उपलब्ध असते तर ही घटना टळली असती.

वैदयकिय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- लॅब टेक्नीशियन व नर्सेस ही पदे रिक्त आहे.ती जागा आपण कंत्राटी पध्दतीने भरतो.त्यांचे मानधन वेळेवर मिळत नसल्याने लोक टिकून रहात नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बिंदू नामावलीमध्ये १२ जागा मंजूर आहे.८ जागा भरल्या आहेत.उर्वरित ४जागा बाबत तुम्ही प्रस्ताव दया.

मा.सभापती साहेब :- जागा भाडेतत्वावर मिळणे बाबत अर्जदार सागर सुभाष भालेराव व अजिंक्य रावजी नांगरे यांनी सभेमध्ये अर्ज केला आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा व अर्जदार सागर सुभाष भालेराव व अजिंक्य रावजी नांगरे यांनी दिलेल्या अर्जानुसार मोकळी जागा नियमानुसार भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा व अर्जदार सागर सुभाष भालेराव व अजिंक्य रावजी नांगर यांनी सभेमध्ये दिलेल्या अर्जानुसार मोकळी जागा नियमानुसार भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदावर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

अर्जदार सागर सुभाष भालेराव यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या गाडगीळ पटांगण शॅपींग सेंटर,भाजी मार्केट भिंती लगत,इलेक्ट्रीक डी.पी.शेजारील खुल्या जागेपैकी १०x१० चौ. फुट जागा

व्यवसायाकरीता मोकळी जागा व अजिंक्य रावजी नांगरे यांना नविन एस.टी.स्टॅण्ड,नगर-पुणे रोड,स्वास्तिक चौक,अ.नगर या ठिकाणी १०x२०चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर देण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका कै. बाळासाहेब देशपांडे दवा. अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदावर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार अर्जदार सागर सुभाष भालेराव यांना अहमदनगर महानगरपालिकेच्या गाडगीळ पटांगण शॅपींग सेंटर,भाजी मार्केट भिंती लगत,इलेक्ट्रीक डी.पी.शेजारील खुल्या जागेपैकी १०x१० चौ. फुट जागा व्यवसायाकरीता मोकळी जागा व अजिंक्य रावजी नांगरे यांना नविन एस.टी.स्टॅण्ड,नगर-पुणे रोड,स्वास्तिक चौक,अ.नगर या ठिकाणी १०x२०चौ.फुट मोकळी जागा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर देणेस हि सभा मान्यता देत आहे. नियमानुसार भाडयाची व अनामत रक्कमेची आकारणी करून जागा भाडेतत्वावर देणे बाबतची सर्व कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.सौ.सुनिता फुलसौंदर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २५ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :-** बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र. सार्व.बांधकाम विभाग ४९० दिनांक ५/६/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. सार्व. बांधकाम विभाग ४९० दिनांक ०५/०६/२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये " सार्व बांधकाम विभागाकडेस सद्यस्थितीत दोनच कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत , व ३ कंत्राटी अभियंता कार्यरत होत्ते , त्या पैकी श्री.सचिन शिवाजी जाधव हे कामावर हजर झालले नाहीत , उर्वरीतपैकी श्री जाधव नंदकिशोर विठ्ठल या कंत्राटी अभियंत्यास जा क्र ६१५५ दिनांक १०/०१/२०१७ अन्वये दिनाक १०/७/२०१७ पर्यतचे कंत्रटी अभियंता म्हणुन कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत . श्री जाधव नंदकिशोर विठ्ठल यांची कामाची मुदत दि १०/०७/२०१७ रोजी संपत आहे.

तरी श्री जाधव नंदकिशोर विठ्ठल,यांचा जा क्र ६१५५ दिनांक १०/०१/२०१७ अन्वये दिनांक १०/१/१७ ते ९/७/२०१७ अखेर तात्पुरत्या नियुक्तीचा कालावधी दिनांक ९/७/२०१७ रोजी समाप्त झालेला असुन बांधकाम विभाग यांचे कडील जा.क्र बांधकाम विभाग ४९० दिनांक ५/६/२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) या पदी श्री जाधव नंदकिशोर विठ्ठल,यांची तिन दिवसाचा तंत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रुपये २०,०००/- या दरमहा माधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समिती पाठविणे बाबत मा मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्ष्क यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,अंदाजपत्रकीय तरतुदी दर्शवुन मुख्यलेखाअधिकारी यांचे अभिप्राय घेवून सादर करा.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,नस्तीमध्ये पृष्ठक्रमांक नोदविणे आवश्यक आहे.मुख्यलेखाअधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावेत वरील पुर्ततेअंती मागील पृष्ठावरिल अ प्रमाणे कार्यवाही करणे उचित राहील,यावर मुख्यलेखापरिक्षक यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- सध्या बांधकाम विभागाकडील अनेक कामे प्रलंबीत आहेत.या विभागात इंजीनियर ची संख्या कमी आहेत.आकृतीबंध मंजूर झालेला असून,बिंदूनामावली सुध्दा मंजूर झालेली आहे.त्यामुळे सदरची तात्काळ भरण्यात यावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा.सभापती साहेब, मागील ब-याच स्थायी समितीच्या बैठकी मध्ये जाहिरात बोर्ड बाबत चर्चा झालेली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- अहमदनगर शहरात आपण किती जाहिरात बोर्ड आहेत.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- ७१ जाहिरात बोर्ड आहेत.

मा.श्री.मुदस्सर शेख :- सध्या या बोर्ड चे काम कोणत्या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

जाहिरात विभाग क्लार्क श्री.देशमुख :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी कडे आहे.

मा.सभापती साहेब :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी ने आजच सभेमध्ये अर्ज देवून मुदतवाढ मिळणे करीता मागणी केली आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- किती वर्ष मुदत वाढ आपल्याला देता येईल.

मा.उपायुक्त श्री.दराडे :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ जाहिरात व फलक नियंत्रण २००३ मधील कलम ७९,२८ (ड) नुसार दोन वर्षासाठी परवानगी देता येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.या ठेकेदार एजन्सी ने दिलेल्या अर्जा मध्ये शहरामध्ये फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावले असून उर्वरित जागेमध्ये तात्रीक बाबींचा अडथळा असत्याने जाहिरात फलक लावू शकले नाहीत.उर्वरित ७१ बोर्ड ची संख्या पुर्ण करण्यासाठी महानगरपालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात यावी तसेच बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे असे नमुद केले आहे.त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.उर्वरीत बोर्ड लावल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.त्यादृष्टीने महानगरपालिकेने ठेकेदारास जागा उपलब्ध करून देणे करीता येणा-या अडचणी दुर करण्यात याव्या किंवा इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. तसेच बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे

मा.श्री.मुदस्सर शेख :- महानगरपालिकेने ७१ ठिकाणांची यादी दिलेली असून सध्या २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लागले आहेत.इतर उर्वरित जागांबाबत तांत्रीक अडचणी येत असेत तर पर्यायी जागा शोधून देणे कामी ठेकेदार संस्था व महानगरपालिकेने सर्व्हे करून जास्तीत जास्त जागांचा शोध घेण्यात यावा.जेणे करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढणार आहे. पुढील दोन वर्षाची मुदत वाढ व भाडे वाढ करण्यात यावी.

मा.श्री.दिलीप सातपुते :- जस जसे नविन बोर्ड लागतील त्यानुसार ठेकेदाराने पालिकेस कळवून त्याच महिन्यापासून जाहिरात बोर्ड भाडे दयावे.महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीकरीता २०% भाडेवाढ करावी.

मा.बाळासाहेब बोराटे :- विषयपत्रीकेवरील पुर्ननियुक्तीबाबतच्या ऑफिस रिपोर्टला मान्यता देण्यात यावी.व सध्या कार्यरत असलेले मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात यावी.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा. ७१ होर्डीग बोर्डाना दोन वर्षा करीता मुदतवाढ देण्यात येवून त्यांच्या भाडयामध्ये २०% भाडेवाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली.यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.त्यामुळे इतर ठिकाणांची जाहिरात कर आपल्याला मिळत नाही. त्यादृष्टीने महानगरपालिकेने ठेकेदारास जागा उपलब्ध करून देणे करीता येणा-या अडचणी दुर करण्यात याव्या किंवा इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. तसेच बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे. ठेकेदार व मनपाच्या सामंजस्याने जाहिरात बोर्डची जागा निश्चिती नंतर ठेकेदाराने सहा महिन्याच्या सर्व बोर्डलावणे बंधनकारक असेल.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ७१ जाहिरात बोर्डाना सध्या कार्यरत असलेले मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतच्या ऑफिस रिपोर्टास मान्यता देण्यात येत आहे.खर्च मंजूर.

सभेमध्ये श्री.आदेश राजमल चंगेडीया यांची संस्था मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली..यांचा प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार महानगरपालिकेने ७१ जाहिरात बोर्ड करीता परवानगी दिलेली असून सध्या फक्त २७ ठिकाणी जाहिरात बोर्ड लावण्यात आलेले आहेत.त्यामुळे इतर ठिकाणी स्थानिक दुकानदार,रस्तारूंदीकरण, स्मारक इ.तांत्रिक बाबींचा अडथळा असल्या मुळे जाहिरात बोर्ड न लागल्याने जाहिरात कर म.न.पा.स मिळत नाही. अहमदनगर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने व ठेकेदार संस्था यांनी सर्व्हे करून इतरत्र पर्यायी जागा उपलब्ध्द करून दयावी. तसेच बोर्डाचे माप मोठे होउ शकत असेल ते बोर्ड मोठे करावे. त्यानुसार वाढीव भाडे आकारण्यात यावे. जस जसे नविन जाहिरात बोर्डलागतील त्यानुसार महानगरपालिकेस कळविण्यात यावे.व त्या महिन्यापासून जाहिरात भाडे महानगरपालिकेस देण्याची कार्यवाही करावी.मनपा व ठेकेदार संस्था यांच्या समंजस्याने जाहिरात बोर्डची जागा ठरविल्यानंतर मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांनी सहा महिन्याच्या आत सर्व बोर्ड लावणे बांधनकारक असेल.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ७१ जाहिरात बोर्डाना सध्या कार्यरत असलेले मे.चंगेडीया आउट डोअर ॲड. प्रा.ली. यांना पुढील दोन वर्षाकरीता मुदतवाढ देवून २०% भाडेवाढ करून महाराष्ट्र शासन राजपत्र २१ जुन २०१४ अन्वये कार्यालयीन अटी व शर्ती प्रमाणे मुदतवाढ व भाडेवाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २६ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

**संदर्भ :** रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग ४३ दि.१६/५/२०१७ अन्वयेचा अहवाल.

विनंती की, रक्तपेढी विभाग यांनी त्यांचे कडील जा.क्र. रक्तपेढी विभाग ४३ दिनांक १६/५/२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " रक्तपेढी विभागामध्ये १) डॉ. मुंकुद तांदळे , हे कर्मचारी रक्तसंक्रमण अधिकारी या पदावर तातपुरत्या स्वरुपात मानधनावर काम करत असुन सदर मानधनावरील कर्मचा-यांचा कामाचा कालावधी दि. १५/१/२०१७ ते १४/७/२०१७ अखेर आहे. सदर कर्मचा-यांचा कालावधी दि. १५/१/२०१७ रोजी संपत आहे. सदर कर्मचा-यांचे नेमणुकीचे कालावधी मध्ये काम समाधानकारक असुन त्यांनी पुर्ननेमणुक मिळणेबाबत इकडील कार्यालयाकडे विनंती अर्ज दिलेला आहे. तरी वरील रक्तसंक्रमण अधिकारी यांना नेमणुकीचा कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे तीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दि. १८/७/२०१७ पासुन सहा महिन्याकरीता रक्तपेढी विभागासाठी रक्तसंक्रमण अधिकारी या पदावर तातपुरत्या स्वरुपात करार पध्दतीने पुर्ननेमणुक करणेस शिफारस आहे. " असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

रक्तपेढी विभाग यांनी त्यांचे कडील यापुर्वीच्या जा.क्र. रक्तपेढी विभाग ७६ दिनांक ०९/०७/२०१५ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दि.१३/१०/२०१५ रोजीच्या दैनिक सामना या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या मुलाखती बाबत जाहिराती प्रसिध्दीस देऊन दि.२७/१०/२०१५ रोजी मुलाखती आयोजीत करण्यात आलेल्या होत्या. त्यानुषंगाने दि.२७/१०/२०१५ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष,निवड समिती, अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली मा. निवड समिती यांनी उपस्थित उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेऊन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड निवड केलेली होती.

निवड झालेले मुकंद चंद्रकांत तांदळे यांची रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ३२१दि.२६/४/२०१७ अन्वये सहा महिन्या करीता दरमहा रु ३५,०००/-या मानधनावर रक्तपेढी विभाग करारबध्द नेमणूक करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुकंद चंद्रकांत तांदळे | रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी | ३५,०००/- | जा.क्र. ३२१ दि.२६/४/२०१७ | १५/०१/२०१७ पासुन सहा महिन्या करीता | १४/०७/२०१७ |

सद्यस्थितीमध्ये वरील संबधितांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक ३२१ दिनांक २६/४/२०१७ अन्वये करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती नुसार सहा

महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली असुन त्यांची सदरची मुदत ही दिनांक १४ / ०७ / २०१७ पासुन समाप्त होत आहे.

मा.महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक-अमपा-२०१२/प्र.क्र.३०१ (भाग-२)/नवि-२५,मंत्रालय,मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधास नुकतीच मान्यता प्राप्त झालेली आहे.

मा. महाराष्ट्र शासन , नगर विकास विभाग , शासन निर्णय , क्रमांक - अमपा - २०१२ / प्र. क्र. ३०१ (भाग -२) / नवि - २५ , मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक ०६ फेब्रुवारी ,२०१६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंधामधील रक्तपेढी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या रक्तसंक्रमण अधिकारी यापदांवर वरील नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे कार्यवाही करुन सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी अत्यावश्यक सेवे करीता सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागासाठी मंजुर दर्शविण्यात आलेल्या रक्तसंक्रमण अधिकारी यापदांवर सरळसेवेने भरती प्रक्रीया विहीत पध्दतीने राबविण्यात येवुन पुढील कार्यवाही करणेसाठी काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागा मध्ये अत्यंत कमी प्रमाणात रक्तसंक्रमण अधिकारी असल्यामुळे तात्काळ नागरिकांना आरोग्यसेवा देणेमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग ३२१ दि. २६/४/२०१७ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात रक्तसंक्रमण अधिकारी या पदांवर खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक १८/०७/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी दरमहा रुपये ३५,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मुकंद चंद्रकांत तांदळे | रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी | ३५,०००/- | रक्तपेढी विभाग |

रक्तपेढी विभाग यांचे कडील जा.क्र.रक्तपेढी विभाग ४३ दि. १६/५/२०१७ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी या पदांवर वरील संबधितांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक १८/०७/२०१७ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबत

मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा या बाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखा अधिकारी,व मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समिती कडे पाठविणेसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी तथा आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. यांचे अभिप्रायासह प्रस्ताव सादर करणे

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पुर्ननियुक्तीचा विषय असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत च्या ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी यापदांवर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत च्या ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २७ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास ११ महिने मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका नगर रचनाकार विभाग.

अहमदनगर शहर हददीतील स्थावर मिळकतीस नोंदी करणे साठी सेवा निवृत्त तहसिलदार/ नायब तहसिलदार / भू-करमापक यांचे पथकाची निविदा मंजूर करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. स्थायी समिती ठराव क्रमांक -१४ दिनांक १०/०५/२०१६ अन्वये ११ महिन्या करिता मुदत वाढ देणेत आलेली आहे. सदरची मुदत दिनांक ०५/०५/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यांनी केलेल्या व करावयाच्या कामाची माहिती सोबतच्या तक्त्यात दर्शविलेली आहे.

**केलेले काम**

कार्यालय कागदपत्र व संबंधातील मिळकतीचे रेकॉर्ड पहाता तत्कालीन म्युनिसिपालटीने संपादन केलेल्या व मंजूर रेखांकनात दर्शविलेल्या एकुण सर्व प्रकारच्या १९०३ खुल्या ,इमारती इत्यादी व रस्त्याचे १७८६ जागेस महानगरपालिकेच्या नांवाच्या नोंदी नसल्याचे आढळून आलेले आहे. आतापर्यत पाठविलेल्या प्रकरणात ११७३ खुल्या व इतर व १२१० रस्त्याच्या मिळकतीस नांवाच्या नोंदी झालेल्या आहेत. व एकूण ७३० प्रकरणे कार्यवाही साठी प्रलंबित आहेत.**(**सोबत तक्ता जोडलेला आहे.**)**

**२.** वरील प्रमाणे नोंदी झालेल्या प्रकरणात हस्तांतरा बाबतची ताबे पावती / पंचनामा ताबे पावती , जागा ताब्यात घेतले बाबतचे पंचनामे करुन घेतलेली आहेत. तसेच काही प्रकरणात संबंधित खात्या कडुन मागणी केलेले परंतु उपलब्ध नसलेले कागदपत्र प्राप्त करुन घेवून प्रकरणे नोंदी साठी पाठविलेली आहेत.

**३.** नगर रचना योजना क्र.४ मधील अंतिम भूखंड क्रमांक १९३, १९५ व सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ व सि.स.नं.७३९७-अ या प्रकरणात पाठपुरावा केलेला आहे.

**४.** अंतिम भूखंड क्रमांक १११ मधील मिळकतीचे उप संचालक भूमि अभिलेख नासिक यांचे कडेस अपील दाखल केलेले आहे.

५. पिंपळगांव माळवी तलाव संपादनात नदी , ओढे ,गांवठाण ,मार्ग इत्यादीचे १०० एकर क्षेत्र आलेले आहे. सदरचे क्षेत्र नियमा प्रमाणे महानगरपालिके कडे वर्ग करणे बाबत मा.जिल्हाधिकारी अहमद नगर यांचे कडे अहवाल सादर केलेला आहे.

६. तपोवन जोड रस्त्या करीता बु-हानगर येथील सर्व्हे नंबर २४ पैकी बाधीत होणा-या जमिनीचा , नविन भूसंपादन कायदया अन्वये प्रस्ताव तयार करुन मा.जिल्हाधिकारी , भू-संपादन शाखा यांचे कडेस सादर केलेला आहे.

७. नगर रचना विभाग , बांधकाम विभाग , अतिक्रमण विभाग यांचे कडून प्राप्त प्रकरणात व मा.महापौर,उप महापौर व नगर सेवक यांचे मागणी प्रमाणे सर्व्हेअर यांनी एकूण ५०२ मिळकतीची मोजणी करुन तसा अहवाल संबंधित विभागात दिलेला आहे.

८. सिना नदी लगतचे नागापुर , बोल्हेगांव , सावेडी , नालेगांव भिंगार व बुरुडगांव येथील गांवातील पुर नियंत्रण रेषेतील अतिक्रमणे निश्चित करणे साठी भूमि अभिलेख खात्याचे अतिक्रमण विभागातील प्रतिनिधी यांचे समवेत नदीच्या पात्रा लगतच्या दोन्ही बाजूचे एकूण- ९६ सर्व्हे मधील १०१८ पोट हिस्साची मोजणी करुन हददी निश्चीत केलेल्या आहेत .**(सोबत तक्ता जोडलेला आहे.)**

९. पिंपळगांव माळवी तलावा साठी १०० वर्षा पुर्वी संपादन केलेल्या जमिनीस महानगरपालिकेच्या नांवाची नोंद करणे साठी संपादना वेळची कागदपत्र प्राप्त करुन घेवून प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला होता .यामध्ये मा.अप्पर जिल्हाधिकारी यांचे कडील आदेशा प्रमाणे कार्यवाही करणे साठी भूमि अभिलेख खात्याशी व तहसिलदार नगर , तलाठी यांचे कडेस पाठपुरावा करुन दोन्ही गांवाचे महानगरपालिकेच्या नांवाने ७/१२ तयार करुन घेणेत आलेले आहेत.

***<u>प्रलंबीत प्रकरणा बाबत करावयाची कार्यवाही --</u>***

**१.** नोंदीसाठी तलाठी यांचे कडे १५८ व नगर भूमापन अधिकारी यांचे कडे १३० प्रलंबित असलेल्या प्रकरणात त्यांनी काही मुददे उपस्थित करुन कागद पत्राची मागणी केल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.

तसेच नोंदी साठी कार्यालया कडून -४४२ खुल्या व ३५६ रस्ता या मिळकतीचे मंजूर रेखांकन , अकृषीक आदेश, ७/१२उतारा, व मालमत्ता पत्रक ,ताबे पावती ,जागा ताब्यात घेतले बाबतचा पंचनामा इत्यादी कागदपत्र प्राप्त करुन घेवून प्रकरणे नोंदी साठी संबंधित खात्या कडे पाठवावी लागणार आहेत.

**२.** पिंपळगांव माळवी तलाव संपादीत क्षेत्राची मोजणी कराण्याची कार्यवाही चालू आहे. त्यात प्रत्यक्ष मोजणी करताना भूमि अभिलेख खात्याच्या मागणी प्रमाणे व मोजणी नंतर आढळून आलेल्या परीस्थीती वरुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**३.** पिंपळगांव माळवी तलाव संपादना खालील नदी , ओढे इत्यादीचे १०० एकर क्षेत्र महानगरपालिके कडे वर्ग करणे बाबत मा.जिल्हाधिकारी अहमद नगर यांचे कडेस सादर केलेल्या प्रस्तावात काही मुददे उपस्थित केल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे यानंतर आदेशा प्रमाणे अधिकार अभिलेखात अंमल घेणे बाबत संबंधिताकडे पाठ पुरावा करावा लागणार आहे.

**४.** मलनिस**:**रण केंद्रासाठी वाकोडी व चाहुराणा बु. येथील संपादन जमिनीची मोजणी करुन हददी निश्चित करुन घ्याव्या लागणार आहेत.

**५.** न्याय प्रविष्ट असलेली अंतीम भूखंड क्रमांक १९३, १९५ व १११ सिटी सर्व्हे नंबर ४७७०-अ व सि.स.नं.७३९७-अ या प्रकरणात पाठपुरावा करुन निर्णया प्रमाणे पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

**६.** महानगरपालिकेच्या नांवाने नोंद झालेल्या ११७३ खुल्या जागेचे ७/१२ व मालमत्ता पत्रकाच्या नक्कला काढून त्याची मुळ आभिलेखाशी पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यात काही चुका असतील तर त्या दुरुस्ती करुन पुढील कार्यवाही करावी लागणार आहे.

**७.** त्याच प्रमाणे नोंदी झालेल्या खुल्या जागेची प्रत्यक्षात मोजणी करुन हददी निश्चित करुन घेणे आवश्यक आहे.

स्थावर मिळकत व्यवस्थापनाचे कामकाजा मुळे प्रमुख्याने पिंपळगांव माळवी येथील तलावा साठी संपादन केलेल्या जेवूर येथील ५४५ एकर व पिंपळगांव माळवी येथील १५३ एकर असे एकूण ६९८ एकर क्षेत्राचा महानगरपालिकेच्या नांवाने ७/१२ तयार झाल्याने या मिळकतीवर मालकी हक्क प्रस्थापीत होवून

अब्जोवधी किंमतीची मिळकत सुरक्षीत झालेली आहे. परिणामी या ठीकाणी पालिकेस उत्पन्न वाढीचे दृष्टीने कोणत्याही प्रकारचा प्रकल्प साकार करणेस तांत्रीक अडचणी निर्माण होणार नाहीत.

जलशुध्दी केंद्रा साठी विळद व मलनिसःरण केंद्रा साठी वाकोडी / चाहुराणा येथील संपादीत केलेल्या जमिनीस महानगरपालिकेच्या नांवाची नोंद झालेली आहे. त्याच प्रमाणे पालिकेच्या एकूण मिळकती , त्यापैकी नोंदी झालेल्या मिळकतीचा सर्व्हे नंबर , त्यातील क्षेत्र , ठिकाण , प्रकार इत्यादी प्रकारची माहिती अदयावत झालेली आहे. तसेच विभागा कडून प्राप्त झालेल्या प्रकरणात तसेच महापौर , उप महापौर , सभापती ,पदाधिकारी यांचे मागणी प्रमाणे पथकातील सर्व्हेअर यांनी मोजणी करुन दिल्याने प्रशासकीय कामात त्यांची मदत झालेली आहे. पथकातील अधिकारी / सर्व्हेअर यांचे काम समाधान कारक आढळून आलेले आहे.

मालमत्तेचे कामे हे महसूल व भूमि अभिलेख खात्या कडून करुन घ्यावी लागतात त्यांचे मागणी प्रमाणे प्रत्यक प्रकरणात स्वतंत्र कागदपत्र असले खेरीज नोंदी केल्या जात नाहीत मागणी प्रमाणे कागदपत्र उपलब्ध नसल्यास प्रति प्राप्त करुन घेणेस विलंब लागतो गेले एक वर्षा पासुन महसूल खात्या कडून मालमत्ता नोंदीचे काम संगणकाव्दारे केले जात आहे. प्रकरणे पाठविल्या नंतरही संबंधित खात्या कडून कार्यवाही वेळेवर केली जात नाही. पथकातील सर्व्हेअर यांनी प्रकरणातील मिळकतीची मोजणी करताना आवश्यकते नुसार त्यालगतचे सर्व बाजू कडील क्षेत्राची मोजणी करुन हददी निश्‍चित केलेल्या आहेत. त्या मध्ये मोठया प्रमाणात प्लॉटची संख्या आढळून आल्याने मोजणीच्या कामा साठी त्यांचा बराच कालावधी गेलेला आहे. अशा परीस्थीतीत प्रकरणे प्रलंबित दिसून येत आहेत.

स्थावर मिळकती मधील कोणत्याही जागेचे बेकायदेशीर हांस्तांतर होउ नये अथवा विकास कामात मालकी हक्काची तांत्रीक अडचणी निर्माण होणार नाहीत त्या साठी प्रत्येक जागेस महानगरपालिकेच्या नांवाची नोंदी होणे गरजेचे आहे. पालिकेतील कोणत्याही विभागात मालमत्ता मिळकतीचे व मोजणी चे कामा साठी स्वतंत्र कर्मचा-याची नियुक्ती केलेली नाही सबब या कामा साठी नियुक्त केलेल्या से.नि. तहसिलदार/ सर्व्हेअर यांचे कामावर खर्च दुबार व अनाठाई झालेला नाही.

पालिकेच्या मालमत्तेची व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची संपुर्णतः माहिती पथकातील से.नि. अधिकारी / कर्मचारी यांना माहिती झाली असल्याने प्रस्तावात नमुद केलेले प्रलंबित प्रकरणात एक सुत्री पणे व बिनचुक कार्यवाही होणे साठी पथकास पुढील कामा साठी ११ महिने मुदत वाढ देणे व त्यासाठी त्यांचे मंजूर निवेदेतील सरासरी प्रमाणे दरमहा रु.४९३३०/- येण-या रक्कमे प्रमाणे ११ महिन्या करीता रु. ५,४२,६३०/- खर्चाचे मंजूरीसाठी प्रस्ताव स्थायी समिती कडे सादर करणे आवश्यक वाटते.आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे नगर रचनाकार यांचा अहवाल असे.

यावर लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महानगरपालिकेची कामाची निकड व आर्थीक हीत लक्षात घेता व केलेल्या आणि प्रलंबीत कामांचा आढावा पहाता मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस्तव हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मुळ नस्तीसह ठेवा.पृष्ठ क्रमांक नमुद करावे.प्रलंबीत असलेल्या कामाची नोंदी सदरच्या कामास किती

यावर फेरसादर, प्रस्तुत प्रकरणी आपल्या कडील प्राप्त सुचने नुसार १ ते९१ पेजींग करण्यात आले असून प्रस्तावानुसार ७३० प्रकरणे प्रलंबित दर्शविण्यात आलेली आहेत.त्याची कारणे व त्याबाबतचे करावयाचे कामाचा तपशील सविस्तरपणे नमुद केला आहे.प्रत्येक मिळकती नोंद लावणेचे काम सुपुर्णःदुस-या विभागाकडून करून घ्यावे लागते,परिपुर्ण कागदपत्रांसह प्रकरणे पाठविण्यात आली तरी अनेकवेळा नविन मुद्दे उपस्थित होवून प्रकरणे परत पाठीवली जातात.काही मिळकतींबाबत गेले ५-६ वर्षापासुन दाखल केलेले दावे

/अपील यामध्ये अदयाप ही अंतिम निर्णय झालेला नाही.अश्या परिस्थीतीत प्रलंबीत मिळकतींची कामे पुर्ण होणेबाबतचा निश्चीत कालावधी ठरविणे शकय नाही.

तरी स्थावर मिळकतींचे नोंदी अदयावत करणेकामी नेमलेल्या पथकास मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती कडेस सादर करणेकामी आदेशार्थसादर.

यावर लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मुळ प्रस्तावित अ नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,लेखापरिक्षणात मधील ज्या काही उणीवा दिसुन येतात त्या नमद करणे लेखा परिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक बाब असते.त्यामुळे विभागास अभिप्राय नुमुद केल्या प्रमाणे विनाकारण त्रुटी काढल्या जात नाही.अशा त्रुटींची पुर्तता संबंधीत विभागानेच पुर्तता करणे आवश्यकच असते.सदर प्रकरणी/प्रस्तुत प्रकरणी ज्या अधिकारी या व पुढील ११ महिन्यासाठी मुदत वाढ दयावयाची आहे.यांचे नाव /पदनाम हे टिपणीत स्वसंस्पष्ट नमुद नाही.टिपणीच मोघम स्वरूपाच्या असल्याने लेखापरिक्षणात त्रुटी निर्देशित आणुन दिल्या जातात.

सबब वरील अ प्रमाणे उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की,समक्ष चर्चा करावी.

यावर मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, मी व मुख्यलेखापरिक्षक आज दि.५/६/१७ रोजी उपायुक्त (सा) यांचेशी चर्चा केली.चर्चेनुसार पुढील पानावर फेरसादर करीत आहे.अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थावर मिळकतीच्या नोंदी अदयावत करण्याच्या काम साठभ मा.स्थायी समिती कडील ठराव १४ दि.१०/५/१६ अन्वये ६/६/१६ पासुन ११ महिने कालावधी साठी म्ळणेजेच दि.५/५/१७ पावेतो श्री.एस.बी.शिंदे,सेवा निवृत्त तहसीलदार यांचे पथकास मुदत वाढ देणेत आलेले असून त्यांची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.सदयस्थितीत या पथकाचे पथक प्रमुख श्री.एस.बी.शिंदे,सेवा निवृत्त तहसिलदार असून त्यात श्री.के.एफ.पठाण,भुमापक व श्री.आर.व्हि.जेवरे,भुमापक कार्यरत आहेत.

सदर पथकास मुदत वाढ देणेची बाब ही शासकीय सेवेतील मुदतवाढ अथवा पुर्ननियुक्ती या सदरात मोडत नाही.यांचे कडे असलेले विशिष्ट काम विचारात घेवून मंजूर निवेदा प्रमाणे नियुक्ती दिलेली आहे.यासर्व बाबींचा विचार करता सदर पथकास मा.स्थायी समितीचे मंजुरीने दि.६/५/१७पासून आकरा महिने म्हणजेच दि.५/४/१८ पावेतो पुर्व मंजूर निवेदे दराने मुदत वाढ देणेस हरकत नाही.सादर करणेत की,सदरहू पथक दि.५/५/१७ पर्यन्तची मंजूर मुदत संपलेली असले तरीही ते कार्यरत असल्याने या पथकास दि.६/५/१७ पासून मुदत वाढ देणे योग्य होईल.असे इकडील मत आहे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,नगररचना विभाग कार्यारंभ आदेश जा.नं.टी.पी./४२२५दि.६/६/१६ अन्वये तसेच मा.स्थायी समिती ठराव नं.१४ दि.१०/५/२०१६अन्वये दि.६/६/२०१६पासून ११ महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आलेली होती.त्यानुसार वरील अ प्रमाणे रक्कम रू.५,४२,६३०/- वार्षीक खर्चास प्रस्तावित केल्याप्रमाणे पुढील मुदतवाढ देण्यास हरकत नाही.

यावर मा.उपायुकत साहेब यांची स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका स्थावर मिळकतीचे नोंदी अदयावत करणे कामी नेमलेल्या पथकास मुदतवाढ मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.सभापती साहेब :- अ.नगर शहर हददीतील स्थावर मिळकतीस नोंदी करणेसाठी सेवानिवृत्त तहसिलदार/ नायब तहसिलदार / भू-करमापक यांचे पथकाची निविदा मंजूर करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांचे काम चांगले असून मनपाच्या स्तावर मालमत्ता नोंदणीचे प्रलंबीत काम करणे आवश्यक आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :-या पथका मार्फत मनपाच्या दृष्टीने चांगल्या स्वरूपाचे काम होत आहे.आपण जर खाजगी संस्थेस हे काम दिले असते तरया पेक्षा कितीतरी पटीने जास्त पैसे आपल्याला दयावे लागले असते.नगररचनाकार विभागा मध्ये अपूरी कर्मचारी संख्या असल्याने त्यांच्या कडून हे काम करून घेणे शक्य झाले नसते.

मा.श्री.दिलीप सातपुते :- महानगरपालीकेच्या स्थावर मालमत्ता नोंदणीच्या अनेक प्रकरणे अदयापपर्यत प्रलंबीत आहेत.त्यामुळे या पथकास मुदत वाढ दयावी.

मा.बाळासाहेब बोराटे :- पिंपळगांव माळवी तलाव संपादना खालील नदी , ओढे इत्यादीचे १०० एकर क्षेत्र महानगरपालिके कडे वर्ग करणे बाबत मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कडे सादर केल्या नुसार याची कार्यवाही त्यांचे मार्फत करणे आवश्यक आहे.तसेच पिंपळगांव माळवी तलाव संपादीत क्षेत्राची मोजणी कराण्याची कार्यवाही चालू आहे. त्यात प्रत्यक्ष मोजणी करताना भूमि अभिलेख खात्याच्या मागणी प्रमाणे व मोजणी नंतर आढळून आलेल्या परीस्थीती वरुन पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याने मुदत वाढ देण्यात यावी.

मा.श्री.मुदस्सर शेख :- महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्ता हया कोटयावीधी किंमतीच्या या पथकाकडून नोंदणी करण्याचे काम हे पथक करीत आहे.या पथकामध्ये सेवा निवृत्त तहसिलदार, नायब तहसिलदार,भू-करमापक या पदावरील अधिकारी असल्याने या कामाचा अनुभव लक्षात घेता त्यांचे मानधनामध्ये वाढ करण्यात यावी.नियुक्ती पासून यांचे मानधात वाढ झालेली नाही.पुढील प्रस्तावामध्ये यांच्या मानधानात वाढ करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-पिंपळगांव माळवी तलावासाठी संपादन केलेल्या७००एकर जमीनीचा १००वर्षानंतर महानगरपालिकेचे नावाने ७/१२ तयार झालेला आहे.यामुळे पालिकेची मौल्यवान किंमतीची मिळकत अबाधित झालेली आहे.तसेच पालिकेस आर्थिक श्रोत वाढविणेचे दृष्टीने भविष्यात याचा उपयोग होणार आहे. याशिवाय अ.नगर शहरातील १०००मिळकतीस महानगरपालिकेच्या त्याचप्रमाणे वाकोडी येथील १६ एकर , चाहुराणा बु II येथील ५ एकर मलनिस्सारण केंद्रासाठी संपादित केलेल्या जमीनीस महानगरपालिकेचे नाव लावून घेतले आहे. अशाप्रकारे स्थावर मिळकत व्यवस्थापनावरील एस.बी.शिंदे निवृत्त तहसिलदार व त्यांचे सहकार्यानी चांगले काम केले या कामाचे मोबदल्यात त्यांना अतिरीक्त ३ महिन्याचे मानधन मंजूर करावे. त्यांना मुदत वाढ देण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार पालिकेच्या मालमत्तेची व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची संपुर्णतः माहिती पथकातील सेवा निवृत्त अधिकारी ,कर्मचारी यांना माहिती झाली असल्याने प्रस्तावात नमुद केलेले प्रलंबित प्रकरणात एक सुत्री पणे व बिनचुक कार्यवाही होणे साठी पथकास पुढील कामा साठी ११ महिने मुदत वाढ देणेस व दि.५/५/१७ पर्यन्तची मंजूर मुदत संपलेली असले तरीही ते कार्यरत असल्याने या पथकास दि.६/५/१७ पासून मुदत वाढ देणेस तसेच त्यासाठी त्यांचे ११ महिन्या

करीता रु.५,४२,६३०/- खर्चास व स्थावर मिळकत व्यवस्थापनावरील एस.बी.शिंदे निवृत्त तहसिलदार त्यांचे सहकार्यानी चांगले काम केले या कामाचे मोबदल्यात त्यांना अतिरीक्त ३ महिन्याचे मानधन देण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार पालिकेच्या मालमत्तेची व त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची संपुर्णतः माहिती पथकातील सेवा निवृत्त अधिकारी ,कर्मचारी यांना माहिती झाली असल्याने प्रस्तावात नमुद केलेले प्रलंबित प्रकरणात एक सुत्री पणे व बिनचुक कार्यवाही होणे साठी पथकास पुढील कामा साठी ११ महिने मुदत वाढ देणेस व दि.५/५/१७ पर्यन्तची मंजूर मुदत संपलेली असले तरीही ते कार्यरत असल्याने या पथकास दि.६/५/१७ पासून मुदत वाढ देणेस तसेच त्यासाठी त्यांचे ११ महिन्या करीता रु. ५,४२,६३०/- खर्चास व स्थावर मिळकत व्यवस्थापनावरील एस.बी.शिंदे निवृत्त तहसिलदार व त्यांचे सहकार्यानी चांगले काम केले या कामाचे मोबदल्यात त्यांना अतिरीक्त ३ महिन्याचे मानधन देण्यास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ०३**

विषय क्रमांक- २८ सोमवार दिनांक ०३/०७/२०१७

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. आर.बी.गायकवाड, वरिष्ठ लिपिक , सा.प्र.वि. यांचे प्रवास भत्ता खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका सामान्य प्रशासन विभाग.

उपरोक्त विषयान अनुसरून सादर करण्यांत येते की,आस्थापना विभागामध्ये सद्यस्थितीत पदोन्नती बाबत व (१२ वर्ष व २४ वर्ष ) सेवांतर्गत आश्वसित प्रगती योजना लागू करणेबाबतची कार्यवाही चालू आहे.सदर प्रस्ताव तयार करीत असतांना ब-याचश्या कर्मचा-यांचे गोपनिय अहवाल अपूर्ण असल्याचे निदर्शनास आलेले आहे.त्यामुळे सदर प्रस्ताव तयार करणेकामी अडचणी निर्माण होत आहेत.

त्यासाठी ज्या कर्मचा-यांनी गोपनिय अहवाल दिलेले आहेत,परंतु त्यावर पुर्नविलोकन अधिकारी यांचा स्वाक्षरी घेणेकरीता कर्मचारी पाठविणे आवश्यक आहे.

तरी सन २००३-०४साठी मुंबई येथे,सन २००४-०५ ते ०६-०७ साठी पुणे महानगरपालिका व विरार महानगरपालिका व भिवंडी महानगरपालिका येथे सामान्य प्रशासन विभागातील कर्मचारी श्री.आर.बी.गायकवाड ,लिपीक यांना पाठविणेस व सदर कामी जाण्या येण्याच्या खर्चास मंजूरी मिळावी ही विनंती.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की,अहवालानुसार मंजूरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मान्य.

यावर मुख्यलेखापरिक्ष यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ किंवा ४५) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,स्थायी समिती समोर प्रस्तावित करणे योग्य.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अहवाल की, अ नुसार पुढील कार्यवाही करिता.

यावर फेरसादर,

विनंती रिपोर्ट की,साप्रवि जा.क्र.४५५ दि.१६/७/२०१५ अन्वये सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांच्या दि.९/७/२०१५ च्या मंजूरीने नगरसचिव यांचे कडे महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम ४४ किंवा ४५) अन्वये अत्यावश्यक असल्याने सादरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यात आला होता.सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव जा.क्र.१३१ दि.२८/८/२०१५ अन्वये पत्रानुसार मा.स्थायी समितीचा निर्णय झालेला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव पुढील निर्णयास्तव मा.आयुक्त साहेब यांचे कडे सादरकरण्यात आला असता मा.आयुक्त साहेब यांनी सदरचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडे दि.२९/८/२०१५ रोजी पाठविण्यात आला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत या प्रस्तावावर कोणताही निर्णयाविना संबंधीत कर्मचारी यांना आस्थापना जा.क्र.२०४७२ दि.३/९/२०१५ अन्वये प्राप्तझालेला आहे.सदर प्रस्तावावर संबंधीत कर्मचारी यांनी महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ चे कलम (४४ किंवा ४५) अन्वये अत्यावश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती च्या निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर घनकचरा विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. आर.बी.गायकवाड, वरिष्ठ लिपिक , सा.प्र.वि. यांचे प्रवास भत्ता खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- प्रवासाकरीता ची प्रवास भत्ता रक्कम रूपये ४९६५/- रूपयांच्या खर्चाच्या ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मागील दि.१७/१२/१६ रोजीच्या सभेमध्ये इदगाह मैदान,मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांना घरपट्टी चर्चा सभेमध्ये झाली होती त्या बाबत काय कार्यवाही करण्यात आली.

प्रभाग अधिकारी श्री.साबळे :- वॉर्ड क्र.११ बील क्र.५०१६ सदर वॉर्ड मध्ये ईदगहा मैदान असून त्याची घरपट्टीची रक्कम ११लाख ३३ हजार ५११/-इतकी थकबाकी आहे.कलम १३२ नुसार सामान्य करामध्ये सूट देणे बाबत सभेमध्ये चर्चा झाली होती.

मा.श्री.मुदस्सर शेख :- ईदगहा मैदान येथे वर्षातून फक्त दोन वेळा म्हणजे रमजान ईद व बकरी ईद या दोन दिवशी नमाज पठण करणे करीता शहरातुन व जिल्हयातुन मुस्लीम समाजाचे भाविक येतात.या जागेचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता करण्यात येत असल्याने या जागेवर आकारण्यात आलेली घरपट्टी माफ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- ईदगहा मैदाना प्रमाणेच शहरातील बरेच ,मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांच्या ट्रस्टच्या रिकाम्या जागा असतील त्यांचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता होत असेल या शहरातील सर्व रिकाम्या धार्मीक स्थळांना आपण संपूर्ण कर आकारणी करतो.ही चुकीची पध्दत असून धार्मीक स्थळांना १३२ कलमाप्रमाणे तरतूद आहे.त्यानुसार घरपट्टी आकारणी करण्यांत येवू नये.

मा.उपायुक्त श्री.दराडे :- धार्मीक स्थळांना १३२ कलमाप्रमाणे तरतूद आहे.की संकलीत कराची आकारणी करण्यांत येवू नये.मंदिराला आकारणी केली जात नाही.पण त्यात बाकीचे जे क्षेत्र वापरात येते त्याला आकारणी लागते. सर्व्हे करून आपण निर्णय घेवू.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे कर्मचारी श्री.गायकवाड यांचे प्रवास भत्याचे रक्कम रूपये ४,९६५/- बील महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ किंवा ४५) अन्वये कार्यवाहीस्तव स्थायी समितीच्या मंजूर करीता असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार ईदगहा मैदान येथे वर्षातून फक्त दोन वेळा रमजान ईद व बकरी ईद या दोन दिवशी नमाज पठण करणे करीता शहरातुन व जिल्हयातुन मुस्लीम समाजाचे भाविक येतात.या जागेचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता करण्यात येतो. तसेच शहरातील बरेच ,मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांच्या ट्रस्टच्या रिकाम्या जागा असतील त्यांचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता होत असेल अशा शहरातील सर्व रिकाम्या धार्मीक स्थळांच्या रिकाम्या जागांना १३२ कलम नुसार संबंधीत विभागांनी आवश्यक कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. आर.बी.गायकवाड, वरिष्ठ लिपिक , सा.प्र.वि. यांचे महाराष्ट्र लेखासंहिता १९७१ चे कलम (४४ किंवा ४५) अन्वये ऑफिस कामा करीता केलेल्या प्रवास भत्याचे रक्कम रूपये ४,९६५/- बील खर्चास मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्टास हि सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार ईदगहा मैदान या जागेचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता करण्यात येतो. तसेच शहरातील बरेच ,मंदिर,मशीद,चर्च,गुरूव्दार यांच्या ट्रस्टच्या रिकाम्या जागा असतील त्यांचा उपयोग फक्त धार्मिक कामा करीता होत असेल अशा शहरातील सर्व रिकाम्या धार्मीक स्थळांच्या रिकाम्या जागांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ नुसार सहाय्यक कर मुल्य निर्धारक,कर संकलन अधिकारी या विभागाने आवश्यक ती कार्यालयीन कार्यवाही पुर्ण करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेमध्ये अवलोकनार्थ देण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका